# संचित

प्रशांत दादासाहेब साखरे

ई साहित्य प्रतिष्ठान



सादर करत आहे

# *संचित*

## मी लिहिलेल्या कथा

लेखक : **प्रशांत दादासाहेब साखरे.**

**(खुशालराव)**

# संचित (कथासंग्रह)


## लेखक: प्रशांत दादासाहेब साखरे (खुशालराव)

पत्ता : उबाळे नगर, वाघोली, पुणे - 412207

ईमेल: nishchintvachak@gmail.com

इंस्टाग्राम हॅन्डल : nishchint_vachak


## मुखपृष्ठ- प्रशांत दादासाहेब साखरे


या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

**प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान**

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)
प्रकाशन : १६ ऑगस्ट २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. २५०/- फक्त (पुस्तक पानांच्या दुप्पट)
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- प्रशांत दादासाहेब साखरे -

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# ओळख एका वाचकाची

मी **प्रशांत दादासाहेब साखरे**. राहणार पुणे. मी एक सर्टिफाइड डेटा ॲनलिस्ट आहे आणि सध्या एका B.P.O. मध्ये MIS म्हणून काम करत आहे.

प्रत्येक लेखकाची सुरुवात हि एक वाचक अशीच होते; आणि पुढे त्याच वाचकाची ओळख बदलून त्याचा लेखक होतो अशी माझी धारणा आहे आणि अशीच माझ्या वाचक या ओळखीच्या आधारावर निर्माण होत असणाऱ्या एका नवीन लेखकाची हि ओळख करून देण्यासाठी मी आपल्याला आज माझ्या वाचनाची सुरुवात कशी झाली हे सांगणार आहे.

वाचनाची आवड मला तशी लहानापासूनच, कदाचित वडिलांपासून वारसाने मिळालेली. आता माझे वडील कोणी खूप काही वाचणारे वगैरे नव्हते; ते एका प्लास्टिक मोल्डिंग कंपनीमध्ये काम करायचे आणि संध्याकाळी जवळच्या चौकात भेळीची गाडी लावायचे.

त्यांचे आवडतं काम म्हणजे भेळ विकण्यासाठी आणलेल्या रद्दीतून वेगवेगळ्या विषयांवरचे लेख, काही लहान कथा, विनोद यांची कात्रणे वगैरे काढणे, ती स्वतः वाचणे आणि जर त्यांना आवडले किंवा त्यांना योग्य वाटले तर मला ती कात्रणे वाचायला देणे. आणि कधी कधी मग "आजच्या कात्रणात काय वाचलं?" हा त्यांचा प्रश्न आणि त्यावर केलेली लहानशी चर्चा, असा माझा वाचनाचा प्रवास सुरू झाला.

सुरुवातीला घरच्या देवाच्या पोथ्या, चातुर्मास, मनाचे श्लोक अशी लहान पुस्तके मी कितीतरी वेळा वाचून काढलेली मला आठवते. कधी कधी उगाच त्यांची कात्रणे ठेवलेली पिशवी उचलून त्यातून काही ना काही वाचायचो; हे जेव्हा त्यांच्या लक्षात आले की मला वाचायला आवडते, तेव्हा त्यांनी मला अकबर-बिरबलच्या गोष्टींचे एक लहानसे पुस्तक आणि आणखी काही लहान-लहान दोन-चार पुस्तके आणून दिली. ती पुस्तके सुद्धा मी कितीतरी वेळा वाचून काढली. नंतर मामांच्या संग्रही असणारी काही पुस्तके वाचली. असे करत-करत माझी दहावी झाली. इथपर्यंत माझ्या वाचनाची ही दशा होती आणि माझ्या वाचनाला काही दिशा नव्हती.

अकरावीसाठी मी शाळा बदलली आणि आता आलो रस्ता पेठेतील आबासाहेब अत्रे प्रशालेमध्ये. हेच ते ठिकाण होते जिथे माझ्या वाचनाची आवड खऱ्या अर्थाने निर्माण झाली किंवा वाढली आणि फक्त सांगायचं म्हणून नाही, तर याचं सर्व श्रेय मी आमच्या शाळेचे ग्रंथपाल आ. प्रसाद भाडसावळे सर यांना देईन. मला अजूनही आठवते, मी सुरुवातीला चार-पाच दिवस रोज वर्ग संपल्यानंतर ग्रंथालयात जायचो आणि फक्त इकडे तिकडे पाहत राहायचो. इतकी पुस्तके, तेही इतक्या वेगवेगळ्या विषयांवरची, ते सुद्धा एकत्र, हे पाहणे

म्हणजे माझ्यासाठी एक अनुभवच होता. मी जाऊन तिथे थांबत जरी असलो, तरी आजपर्यंत मी कशाला हात लावला नव्हता. कदाचित कोणी ओरडेल किंवा कोणी काही बोलेल ही भीती वाटत होती.

आणि तो दिवस आला. त्या दिवशी आमचे वर्ग संपल्यानंतर मी गेल्या काही दिवसांप्रमाणे ग्रंथालयात गेलो आणि इकडे तिकडे पाहत उभा होतो. सरांनी मला आवाज दिला. आता हे काय बोलतील, याची मला भीती. पण त्यांनी माझी विचारपूस केली, कोणत्या वर्गात आहेस वगैरे. रोज येऊन काय पाहतोस, विचारले. असे विचारल्यानंतर मी आपली मान खाली घालून "काही नाही" असे उत्तर दिले. अशी ही माझी खऱ्या अर्थाने ग्रंथालयाची पहिली भेट!

आणि मग त्यांच्या मार्गदर्शनाखाली मी हळूहळू अगदी लहान-लहान पुस्तके वाचायला चालू केली. सुरुवातीला लहान-लहान कथा वाचायला सुरुवात केली. यावेळेस मला फास्टर फेणेच्या कथा खूपच आवडल्या होत्या. त्यानंतर इसपनीती, अकबर-बिरबल, असे करत-करत मी कधी 'मृत्युंजय'पर्यंत पोहोचलो, हे मला कळलेच नाही. आणि 'मृत्युंजय' वाचणे म्हणजे एक वेगळाच अनुभव! जणू काही सर्व माझ्यासमोरच घडतंय.

आणि मग कादंबऱ्या वाचायचा छंदच लागला. मी एक कादंबरी वाचून झाली की सरांकडे जायचो आणि "आता काय वाचू?" विचारायचो. कितीतरी वेळेस तर मी एखादी कादंबरी वाचून पूर्ण करण्या अगोदरच सर मला आणखी एखादी कादंबरी किंवा कथांचे पुस्तक देत आणि "हे वाच, तुला आवडेल" किंवा "आता तू हे वाचलं पाहिजे" असं म्हणत. खरंच, माझ्या वाचनाच्या छंदाचा तो जसा सुवर्णकाळच होता!

अकरावीत असतानाच माझे वडील वारले आणि त्या दुःखातून बाहेर पडण्यासाठी पुस्तकांच्या अजून जवळ गेलो. त्याच वेळी स्वामी विवेकानंदावर लिहिलेली पुस्तके म्हणजे माझ्यासाठी खजिनाच असायची. असे करत माझी बारावी सुद्धा संपली. मी शाळा सोडल्यानंतरही ग्रंथालयात वारंवार जायचो आणि वेगवेगळी पुस्तके घेऊन वाचून परत करायचो. मला आवडलेल्या काही पुस्तकांची नावे सांगायची झाली तर सगळ्यात आधी 'मृत्युंजय', 'आम्ही दिवटे', 'पॅपिलोन', 'सत्यम शिवम सुंदरम' (रवींद्र भट), 'उदयन' सरांच्या सांगण्यावरून मी 'मुद्राराक्षस' याचं मराठी भाषांतर वाचलं होतं, तेही मला खूपच आवडले होते. तशी ही लिस्ट बरीच मोठी आहे आणि आजही त्यात हळू हळू भर पडत आहे, पण या पुस्तकांनी सुरवातीच्या काळात माझ्या वाचनावर आणि एकूणच माझ्यावर खूप प्रभाव पाडला.

आता खरं तर आणखी वाचनाबद्दल सांगायचे झाले तर खूप काही आहे, पण एवढेच म्हणेन की आमचे ग्रंथपाल आ. प्रसाद भाडसावळे सर यांच्यामुळे माझ्या वाचनाला दिशा मिळाली आणि माझ्या वाचनाची दशा सुधारली. गुरुजनांचे ऋण आपण फेडू शकत नाही, याची जाणीव मला आहे; पण तरीही माझ्यामधल्या एका वाचकाची ओळख मला त्यांनी करून दिली आणि त्यासाठी मी त्यांचा सदैव ऋणी आहे...

# अर्पणपत्रिका

माझ्या बालमनात वाचनाच्या आवडीचे बीज पेरणाऱ्या माझ्या कैलासवासी वडिलांच्या आणि ज्यांनी त्या बीजाला अंकुरित होण्यासाठी मला योग्य त्या वेळी आणि आजही मार्गदर्शन करत असणाऱ्या आमच्या महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री. भडसावळे सर यांच्या चरणी अर्पण

# अनुक्रमणिका

एकांताची भेट

निकाल

गर्भ

एकतर्फी

शेवटची भेट

वारसा

माझं बाळ कुठाय?

अगम्य

**या कथांविषयी...**

या कथा मी कुठलाही मोठा प्लॅन करून किंवा ठरवून नाही लिहिल्या. गेल्या काही वर्षांत जसं-जसं डोक्यात आलं, जे जाणवलं, ते मी कागदावर उतरवत गेलो, आणि त्या कथांचा संग्रह करून मी इथे प्रकाशित करत आहे आणि त्यामुळेच मी या कथासंग्रहाला त्यातल्या एखाद्या कथेचे नाव न देता 'संचित' हे नाव दिले आहे.

ह्या अशा कथा आहेत ज्या मी सहज आणि माझ्या मनापासून लिहिल्या आहेत. जर या गोष्टी वाचकांना आवडल्या आणि त्यांच्या मनाला भिडल्या, तर मला खूप आनंद होईल. अशा अनेक कथा आहेत ज्या मला वाचकांपर्यंत पोहोचवायच्या आहेत. माझ्या लेखणीच्या धावेसाठी उठलेले हे पहिले पाऊल आपण सर्व सुजाण वाचक गोड मानून घ्याल एवढीच माफक अपेक्षा!

या सर्व कथा संपूर्णपणे काल्पनिक आहेत, आणि कल्पना ही अखेर वास्तवावरच आधारित असते, त्यामुळे यातील एखादे नाव, प्रसंग किंवा परिस्थिती कुणाशी जुळल्यासारखी वाटल्यास तो निव्वळ योगायोग समजावा, ही नम्र विनंती.

तुमच्या प्रतिक्रियेच्या आणि प्रतिसादाच्या प्रतीक्षेत..!

nishchintvachak@gmail.com आपण या मेल वर किंवा nishchint_vachak या Insta handle वर मला प्रतिक्रिया पाठवू शकता

# एकांताची भेट

बाहेर पाऊस पडत होता, मातीचा सुगंध घरात दरवळत होता. नवीन आपल्या डेस्कवर बसून बाहेर रस्त्यावर येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांना पाहत होता आणि सखोलपणे काहीतरी विचार करत होता.

नवीन मुंबईमध्ये गेल्या ६ वर्षांपासून सॉफ्टवेअर डेव्हलपर म्हणून काम करत होता. सर्व काही चांगले होते - काम, पगार, नयनासोबत रिलेशनशिप, सर्व काही चांगले चालले होते, पण गेल्या काही आठवड्यांपासून त्याला आपल्या आत खूप रिक्तपणा जाणवत होता. जणू काही त्याच्याकडे सर्व काही असून सुद्धा काहीतरी होते जे त्याला हवे होते, पण काय हवे हे त्याला समजत नव्हते... तो कित्येकदा मित्रांसोबत, नयनासोबत असूनही एकटेपणा अनुभवायचा. त्याने अनेकदा सर्वांमध्ये मिसळण्याचा, आनंदी राहण्याचा प्रयत्न केला, पण काहीतरी होते जे हरवले होते. आता त्याच्या वागण्यात काहीतरी बदलले होते... त्याला सर्व काही रुक्षपणाचे वाटत होते... म्हणूनच तो सायकॉलॉजिस्टकडे गेला, तेव्हा त्यांनी त्याला एक टास्क दिला होता की काही दिवस सर्वांपासून वेगळे एकटे राहा - न इंटरनेट, न टीव्ही, न कोणासोबतही मिसळणे. त्याला खऱ्या अर्थाने हे पटले नाही, छे या सगळ्याने काय होणार असे म्हणत त्याने काही आठवडे घालवले पण एका दिवशी अगदीच असह्य झाले, चला किमान प्रयत्न करून पाहून

बघू कदाचित काही फरक पडेल आणि नाही पडला तर एक नवीन अनुभव मिळेल असा त्याने विचार केला. आपल्या गावी जाऊन हा प्रयोग करायचे त्याने ठरवले कारण इथे शहरात सगळ्यांसोबत राहून हा प्रयोग करणे शक्य नव्हते, म्हणून त्याने सुट्टी घेऊन गावी जायचे ठरवले.

त्याच्या पालकांनी सुद्धा जिद्द केली होती की तेही त्याच्यासोबत गावी येतील, पण त्याने आपल्याला काही काम आहे आणि त्यासाठी आपल्याला पूर्णपणे एकांताची गरज आहे असे सांगून त्यांना एक आठवड्यानंतर येण्यासाठी समजावून सांगितले. त्याने नयनाला तो नेमका गावी का जात आहे हे खरे-खरे सांगितले. सुरुवातीला तिने नवीनच्या काळजीपोटी सोबत येण्याची जिद्द केली पण त्याने तिला समजावून सांगितले. आणि नवीनने घरच्यांना हेही सांगितले की या दरम्यान जर काही गडबड होत नसेल तर तो कोणाशीही कॉन्टॅक्ट करणार नाही, म्हणून कोणीही त्याची चिंता करू नये... खाण्यापिण्यासाठी सोय त्याने करून ठेवली होती.

आज २ दिवस झाले होते त्याला गावी येऊन. तो सकाळी उठायचा, छतावर जाऊन फेरफटका मारायचा, मग खाली येऊन चहा-नाश्ता बनवून खायचा आणि सोबत दुपारचे जेवण बनवून घ्यायचा जेणेकरून नंतर काहीही काम राहणार नाही... असेच आज तो आपल्या डेस्कवर बसून बाहेर रोडकडे बघत विचार करत होता की

कशाप्रकारे गेल्या काही वर्षांत त्याने अनेक गोष्टी कष्टाने मिळवल्या - मुंबईमध्ये जॉब, मग एक फ्लॅटही घेतला, गाडी घेतली. नयनाबद्दल आपल्या घरच्यांना सांगितले, घरच्यांनी नयनाला सून म्हणून स्वीकारले होते आणि पुढच्या वर्षी या दोघांचेही लग्न लावून एका जबाबदारीतून आम्ही मुक्त व्हावे असे दोन्हीकडील घरच्यांचे मत होते. एक प्रकारे तो आपली ड्रीम लाईफ जगत होता, पण या धावपळीत कदाचित तो स्वतःपासून दूर गेला होता....

जेव्हा तो इथे आला, पहिला दिवस तर मोठ्या आरामात सरला... पण दुसऱ्या दिवशी त्याला अस्वस्थता जाणवायला लागली. त्याने अनेकदा घरी परत जाण्याचा किंवा कोणाशी ना कोणाशी कॉन्टॅक्ट करण्याचा विचार केला, पण नंतर तो आपल्या एकटे राहण्याच्या निर्णयावर ठाम राहिला. नवीनला इतक्या एकांताची सवय नव्हती, तो नेहमी लोकांनी वेढलेला असायचा... पण आज त्याला कित्येक दिवसाने आराम वाटत होता. त्याने अनेक वर्षांनंतर इतकी शांती अनुभवली होती. त्याने आज घरात ठेवलेली आपली लहानपणीची डायरी काढली आणि ती वाचत, आपल्या लहानपणच्या दिवसांना, त्या क्षणांना आठवत तो मनापासून हसत होता... अनेक वर्षांनंतर आज जणू त्याच्या आतील लहान मुलगा जागा झाला जो काहीतरी बनू इच्छित होता, काहीतरी मिळवू इच्छित होता पण काही नसतानाही तो लहान मुलगा आनंदी होता...

या सर्व गोष्टींचा विचार करताना कधी संध्याकाळ झाली त्याला समजले नाही... पाऊस कधीचा थांबला होता, सूर्य मावळत होता. तो आपल्या डेस्कवरून उठला, खोलीतील लाईट्स लावली आणि स्वतःसाठी चहा बनवू लागला. चहा बनवतानाही त्याच्या चेहऱ्यावर एक स्थैर्य होते, एक शांती होती. त्याने इतकी शांती खूप काळापासून अनुभवली नव्हती... कसे तो स्वतःला नेहमी व्यस्त ठेवायचा, कधी लोकांसोबत, कधी पुस्तके, कधी गेम्स खेळत आणि अनेकदा मोबाईलवर इंटरनेट चालवत... तो विचार करत होता की कसे त्याने स्वतःला इतके व्यस्त केले की त्याच्या आयुष्यातला कित्येक काळ तो जणू काही जगतच नव्हता, तो फक्त वेळ घालवत होता...

पुढचे दोन-तीन दिवस कधी तो अस्वस्थ व्हायचा, कधी खूप शांती जाणवायची. या दिवसांत तो अनेकदा अंगणात असलेल्या जुन्या झाडाला तासनतास पाहत राहायचा, पक्ष्यांचा आवाज मोठ्या मधुरतेने ऐकायचा. कधीकधी तर फक्त तासनतास असेच शांत बसून राहायचा, जणू स्वतःच्या हृदयाचे ठोके ऐकण्याचा प्रयत्न करत असावा. हळूहळू दिवसाच्या बहुतेक वेळ त्याच्या मनात एक खोल शांती पसरू लागली... त्याने या दिवसांत आपल्याबद्दल, आपल्या आयुष्याबद्दल अनेक गोष्टी जाणून-समजून घेतल्या. कधी ६ दिवस गेले कल्पनाही झाली नाही, असे वाटत होते जणू आयुष्याने आपली वेगळी ओळख

करून दिली होती... कालच गावातून कोणीतरी येऊन सांगून गेले होते की आज संध्याकाळी त्याचे आई-वडील गावी येत आहेत...

तो आनंदी होता, शांत होता आणि स्वतःला आणि त्या सायकॉलॉजिस्टला मनापासून धन्यवाद देत होता. त्या त्रासाला धन्यवाद देत होता की या सर्व गोष्टींमुळे तो स्वतःला भेटू शकला. त्याच्या एकटेपणात त्याला एकांताचा अर्थ समजला... स्वतःसोबत वेळ घालवणे ही वेळेची नासाडी नाही तर एक महत्त्वाची गोष्ट आहे, कारण आपण इतरांसोबत वेळ घालवतो, त्यांना ओळखतो पण स्वतःला ओळखत नाही आणि याच कारणांमुळे मनावर ताण येतो. कित्येकदा आपल्या आयुष्यात अनेकदा अशा समस्या उद्भवतात ज्यांचे वास्तविक जीवनात कोणतेही अस्तित्व नसते याची प्रचिती त्याला आली.

# निकाल

विनिता :- काय रे महेश? काय झालं!? असा उदास का झालास? आज तर आपला रीझल्ट आहे ना, मग असा कॉलेजच्या बाहेर का बसलास? घेतला का रीझल्ट?

महेश :-.....

विनिता :- अरे बोल ना काहीतरी... काय झालं? एखादा विषय राहिला का? राहिला असेल तर काय होईल... पुढच्या सेम ला परत एक्झाम दे, निघेल पुढच्या वेळी.

महेश :- तुला काय गं... तू आहेस ऑल क्लियर.....

विनिता :- अरे असा का बोलतो... आपण सगळ्यांनी एकत्रच अभ्यास केला होता ना... आपल्या ग्रुप मधल्या सगळ्यांचे सब्जेक्ट निघालेत आणि तू पण तर भरपूर अभ्यास केला होतास ना... मग काय झालं तरी काय नेमकं.... रिव्हिजन सुद्धा खूप चांगली केली होतास तू..

महेश :- तुला माहीत आहे ना माझा प्रॉब्लेम... मग का विचारतीयस....? काय होतं मला पेपर लिहिताना काय माहीत..! एखादा दुसरा प्रश्न लिहून होई पर्यंत बाकीच्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे विसरून जातो मी.... क्वेश्चन पेपर वाचताना माहीत असतं मला, की केलाय मी या प्रश्नाचा अभ्यास पण मला नाही आठवत त्या वेळी उत्तरं, तर त्यात माझी काय चूक? सांग ना तूच... तू स्वतः सुद्धा किती तरी वेळा माझा अभ्यास घेतला आहे ना.... मग....

विनिता :- किती सब्जेक्ट गेले?

महेश :- २

विनिता :- होशील रे पुढच्या सेम ला पास.. आणि सगळ्यांना माहीत आहे की तू अभ्यास करतो... उलट थोडाफार जास्तच करतोस तू अभ्यास पण तरी खरंच आम्हाला पण नाही कळतं की....

महेश :- सॉरी गं, मला माहिती आहे की मला चिडवण्यासाठी नाही बोलली तू पण....

विनिता :- ठीक आहे रे मी समजू शकते....

महेश :- सगळं खरं... पण मी आता घरी गेल्यावर आई-वडिलांना काय सांगू..? त्यांच्या किती अपेक्षा आहेत माझ्याकडून... आणि मी... मी हा असा.. जाऊ दे आता घरीच जाणार नाही मी. बघ ना आज पर्यंत एकदा सुध्दा कुठल्याच विषयात मी नापास नाही झालो पण प्रत्येक वेळी मी इतका अभ्यास करून कधीच ५० टक्क्यांच्या पुढे कधीही नाही गेलो.

विनिता :- होतं रे असं.... मला माहित आहे की तुला किती वाईट वाटत असेल, पण.... पण इतकं मनाला नको लावून घेऊ होशील ना पुढच्या सेमला पास, आपला आख्खा ग्रुप आहे तुझ्यासोबत

महेश :- तुला माहिती आहे विनू मी बघत असतो ना आजूबाजूला इतरांचे आई-वडील त्यांच्या मुलांना ५५-६० टक्के पडले तरी किती ओरडतात-मारतात पण मी लहानपणापासून इतका ढ असून सुद्धा माझे आई-वडील या बाबतीत मला कधी काही बोलले नाही तात्पुरत ओरडतात पण.. पण दरवेळी माझा आत्मविश्वास कायम राहावा म्हणून माझी समजूत काढतात... आणि मी... जाऊ दे मला नाही जायचं घरी... कुठल्या तोंडाने घरी जाऊ मी...!

दोन-तीन मिनिटे दोघेही शांतच राहिले

विनिता :- चल आम्ही सगळे येतो तुझ्या सोबत... आम्ही बोलतो तुझ्या आई-वडीलांशी.... ऐ विघ्नेश जा बरं आपल्या ग्रुप मधल्या दोन-तीन जणांना बोलव....

विघ्नेश :- काय झालं?

विनिता :- तुला सांगितलं तेवढं कर ना.... नाहीतर थांब मीच बोलविते

महेश :- नाही... नको.., काही गरज नाही त्याची

विनिता :- मग.... जातोय ना घरी..?

महेश :- हो...

महेश :- नक्की....!?

महेश :- ह्म्म...

विनिता :- चल बाय.. आणि घरी पोहोचलास की फोन कर.....

महेश :- ह्म्म...

महेश दिवसभर इकडे तिकडे फिरत राहतो त्याला काय करावं काहीच सुचत नाही.

इकडे २ तास झाले तरी महेशने घरी पोहोचलो म्हणून फोन न केल्यामुळे विनिता थोडीशी घाबरते तशी तिला खात्री असते की तो स्वतःचं बरेवाईट करून घेणार नाही पण तो निघून जाऊ शकतो.. ती विचार करत करतच महेशला फोन करते.. एक-दोन रींग नंतर महेश फोन उचलतो...

महेश :- बोल...

विनिता :- अरे तू घरी गेल्यावर मला फोन करणार होतास ना मला, मंग..? आणखीन घरी नाही गेलास का तू?

महेश :- चाललोय घरी... (फोन कट करतो)

विनिता त्याला परत फोन करते तर त्याचा फोन बंद येतो. तिला वाटतं बॅटरी वगैरे संपली असेल.. घरी पोहोचल्यावर करेल फोन....

महेश विनिताला घरी चाललोय असं खोटंच बोललेला असतो.... तो नदीच्या विरान किनाऱ्या चाललेला असतो... हो जीव देण्यासाठीच... चालता चालता त्याच्या मनात एखाद्या चित्रपटाप्रमाणे त्याला त्याचे आई, वडील, लहान बहीण स्मृती यांच्या सोबतीच्या आठवणी येत असतात. तो एक-दोन मिनिटे त्या आठवणीत रमतो...

खरंतर त्याला त्या आठवणी आणखीनच वैताग आणतात तो पुढचा-मागचा विचार न करता पाण्यात उडी घेतो....

आईईईईई.....

अचानक आलेल्या किंचाळीमुळे स्मृती डचकून जागी होते... उठून बघते तर महेश उठून घाबरलेल्या अवस्थेत बसलेला असतो.. ओरडण्याचा आवाज ऐकून महेशचे आई आणि वडील पळतच या दोघांच्या खोलीत येतात... तर महेश अजूनही घाबरलेलाच असतो... स्मृती तेवढ्यात किचनमधून पाणी घेऊन येते...

स्मृती :- दादा, घे पाणी पी....

पण महेश अजूनही तसाच धक्क्यातच असतो

आई :- स्मृतीच्या हातातून ग्लास घेते, हे तिघेही महेशच्या आजूबाजूला बसतात..... अर्धा-एक मिनिट कोणीच काही बोलत नाही... आपण आत्ता स्वप्न बघितले हे लक्षात आल्यावर महेश आईच्या हातातून पाण्याचा ग्लास घेऊन घटाघट पितो....

आई :- अरे जरा हळू.. महेशचं पाणी पिऊन झाल्यावर त्याच्या डोक्यावरून हात फिरवत विचारते... काय झालं बाळा? वाईट स्वप्न बघितलं का एखादं?

(खरं तर तिघेही थोडेसे हैरान झाले होते. कारण महेशला जरी कधी वाईट स्वप्न पडलं तरी तो कधी असा घाबरून उठला नव्हता उलट दुसऱ्या दिवशी स्वतःच स्मृतीला त्या स्वप्नाची आणि स्वतःची सुद्धा थट्टा उडवून सांगत असतो.)

महेश फक्त होकारार्थी मान हलवतो..

आई :- काय पाहिलंस स्वप्नात?

महेश :- मी आत्महत्या केली....

महेशची आई काही बोलणार तेवढ्यात तिला महेशचे वडील थांबवतात व स्वतःच विचारतात

वडील :- का?

महेश :- कारण मी नापास झालो....

वडील :- एक विचारू? प्रामाणिकपणे उत्तर दे... तू या वर्षी अभ्यास केला होता का?

स्मृती :- हो, दादा रोज

वडील शांतपणे तिच्याकडे बघतात...

महेश :- हो, केला होता... ते सुद्धा मन लावून.... मलाच या वेळी ५० च्या वर टक्के पाडायचे आहेत.

....

त्याचे वडील त्याच्या मनाची स्थिती ओळखून बोलतात...

तुला माहिती आहे महेश मी आमच्या कंपनीत माझी १२ वी नापास झाल्यावर एक साधा कामगार म्हणून लागलो होतो आणि आज २२ वर्षानंतर मी तिथे सिनियर मॅनेजर म्हणून काम पाहतो...

आता यांच्या या स्टोरीचा आणि महेशच्या स्वप्नाचा काय संबंध? असा विचार करतच महेशची आई बाकीच्या तिघांना बघते...

महेशचे वडील दोन क्षण थांबतात आणि परत बोलू लागतात.. तुला माहीत आहे महेश माझ्या आजपर्यंतच्या यशाचं रहस्य काय आहे ते?

आता महेशही त्याच्याकडे थोडासा वैतागूनच बघतो, पण त्याच्या वडिलांना बढाया मारण्याची सवय नसल्याने तो काहीतरी असेल असं विचार करून शांतपणे ऐकत राहतो..

वडील :- मी ना ज्यावेळी १२ वी नापास झालो त्याच वेळी स्वतःच नोकरी शोधली तुझे आजोबा म्हणत होते की कर तुझं शिक्षण पूर्ण.., कमीत कमी १२ वी तरी पूर्ण कर... पण नाही, कोणी सांगितलं म्हणून ऐकेल तर तो मी कुठला.. मी सांगितलं की मला बोलावलंय ४ दिवसाने कामावर रुजू व्हायला आणि मला सुद्धा जायचंय तेव्हा माझ्या वडिलांनी परवानगी तर दिली पण एक-दोन दिवस काही बोलले नाही माझ्याबरोबर.. पण नंतर सगळं काही ठीक झालं. मी कामावर तर व्यवस्थित जात होतो पण प्रॉब्लेम असा होता की १-२ महिने झाले तरी माझं मन काही लागत नव्हतं साहजिकच आहे त्यामुळे माझं काम सुद्धा काही खास होत नव्हतं. प्रयत्न खूप करत होतो पण.... कुठेतरी वाटत होतं की काय मिळणार आहे हे काम करून जाऊदे... शेवटी वैतागून मी नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला..

घेतलेला निर्णय कामावर सांगण्याच्या अगोदर घरच्यांच्या भितीने घरी सांगितला. तर घरी सगळे विचारत होते सल्ले देत होते की कशाला काम सोडतोय, आणखी काही दिवस काढून बघ वगैरे वगैरे.. पण तुमचे आजोबा मात्र शांत होते... ते बघून मला आनंद आणि भीती दोन्ही एकत्रच वाटून गेली. आनंद वडील काही बोलले नाही याचा तर भीती... अं... काय म्हणता तुम्ही त्याला?! हा... तुफान के पेहले वाली शांती.. तसं तर काही नाही ना याची... झाली एकदाची कशीतरी रात्र.. रात्री जेवण झाल्यावर बाबांनी मला त्यांच्यासोबत येण्यासाठी खुणावले तशी शतपावली करणे ही त्यांची रोजची सवय, पण कधी

खचितच कोणाला घेऊन जात असत.. मी त्यांच्या मागे-मागे चाललो होतो खरं, पण पुढे काय होणार या भितीने धडधड व्हायला झालं होतं.. त्यांनी मला हळूच सोबत घेऊन माझ्या खांद्यावर हात ठेवून चालवलं.. खांद्यावर हात ठेवून घेतल्यावर मी फक्त आता तोच हात माझ्या कानावर कधी पडतो याचीच वाट बघत होतो.. पण झालं काहीतरी वेगळं आम्ही दोघं एका कठड्यावर बसलो....

बाबा :- मग विनोबा, काय अडचण आहे नाही म्हटलं कळू तरी द्या बापाला...

मी भीतीमुळे गप्पच.. माझी अशी अवस्था बघून बाबांचा आवाज थोडा नरम झाला.

बाबा :- काय झालं विनोबा? कामावर कुणी काही बोललं का?

मी :- नाही.

बाबा :- मग, पगार कमी हाय?

मी :- नाही.

बाबा :- कोणी काही त्रास देतय का?

मी :- नाही..

बाबा :- सांग की लेका... का काम सोडायलास...?

मी :- जे होईल ते बघून घेऊ असा विचार करून मी उरला-सुरला सगळा धीर एकवटून सांगितलं..

अण्णा मी खरंच खूप प्रयत्न करतोय मन लावून काम करण्याचा पण राहून-राहून एकच विचार मनात येतो की होणार काय आहे हे काम करून.. माझं काम सुद्धा मला थोडफार आवडतं पण पुढे काय? या विचाराने मला अक्षरशः नको-नकोसं केलंय.. त्यामुळे माझं कामात मन नाही लागत. म्हणून माझं काम सुद्धा माझ्या मनाला समाधान मिळेल असं नाही होत.. तुम्हीच सांगा आता मी काय करू?

दोन क्षण थांबून

बाबा :- तुला तुझं काम आवडतं?

मी :- हो...

बाबा :- मग तुझं पुढं काय होईल की हीच चिंता हाय न्हवं?.

मी :- मानेनेच होकार दिला.

बाबा :- हे बघ पोरा, आयुष्यामधी कधीबी ध्यानात ठेव... आपल्याला लई जागा बघायच्या असत्यात, लई सपन असत्यात, जी आपल्याला पूर्ण करायची असत्यात... आपल्याला जसं एखाद्या नवीन ठिकाणी पोहोचण्यास कुणीतरी रस्ता दाखवणारा, एखाद्या वेळी सुरुवातीला सोबत करणारा पाहिजे असतोय, पण तिथवर आपल्यालाच जावं लागतंय; तसंच आपली स्वप्न पुरी करायला, काम व्यवस्थित करायला पण कुणीतरी गुरू लागतोय, पण तिथपण काम आपलं आपल्यालाच करावं लागतं. गुरू फकस्त रस्ता दाखवतो, आपण तो रस्ता ध्यानात ठेवून फकस्त पुढच्या पावलावर लक्ष ठेवायचं,

तवाच आपण आपल्या जागेच्या एक पाऊल जवळ जातोत. एकदा कुठं जायचं ते ठरवलं, त्याचा रस्ता माहिती पडला, की कुठं जायचंय याचा विचार करण्यापेक्षा आत्ता पुढचं पाऊल कुठल्या बाजूला टाकायचं आणि त्यात एखादी अडचण आली की ती कशी बाजूला सारायची, एवढंच बघायचं. तसंच कामात बी हाय लेकरा, आपुण काय काम करायचं हे ठरवल्यावर ते कसं करायचं आणि त्यात अडचणी आल्यावर काय करायचं, एवढंच बघावं. वेळ आलीच तर एखाद्या वेळी रस्ता थोडा बदलायला हरकत नाही, पण आपण कुठं जायला निघालोय हे लक्षात घेऊनच! हे बघ पोरा, तुझी नोकरी सोडायची का करायची, हे तुझं तू ठरव; मी मधी आडकाठी नाय आणणार, पण जे बी काम करशील, ते व्यवस्थित कर.

मी :- तर हेच आहे माझ्या यशाचं सीक्रेट.. कळलं का?

स्मृती :- हो कळलं बाबा, पण बाबा एवढं सगळं आमच्या कधीपर्यंत लक्षात राहणार याला सम अप करा ना प्लीज...

मी :- बघ बाळा आपण एकदा ठरवलं ना की आपल्याला काय मिळवायचं आहे की मग त्यासाठी एक प्लॅन बनवायचा आणि लगेच कामाला जायचं.. चुकलो तर हरकत नाही चूक दुरुस्त करून पुन्हा प्रयत्न करायचा.. प्लॅनमध्ये बदल करावा लागला तर चालेल पण ध्येय नाही बदलायचं... ओके?

महेश :- पण बाबा याचा माझ्या स्वप्नाशी काय संबंध?

आता महेशच्या वडिलांनी डोक्यावर हात मारून घ्यायचेच तेवढं बाकी राहिलं... पण त्यांनी तसं न करता शांतपणे सांगितले.

वडील :- हे बघ महेश तू रस्ता तर व्यवस्थित चाललास ना! म्हणजे अभ्यास तर मनापासून आणि व्यवस्थित केलास ना मग पास होशील का नापास याची काळजी करू नकोस.. एखाद्या विषयात नापास झाला तर परत परीक्षा दे.. ठीक आहे?

महेश :- थोड्याशा खुषीतच,

आई : तुला एक सांगू? जगाचा एवढा विचार नको करूंस मला मान्य आहे की या जगात स्पर्धेला खूप महत्त्व दिलं जातं आणि ते एका मर्यादेत बरोबर देखील आहे. पण मला सांग महेश जर एखाद्या माशाला सांगितलं की तू मला झाडावर चढून दाखव आणि एखाद्या माकडाला सांगितलं पोहून दाखव म्हणून तर विचार करून बघ त्या दोघांची सुद्धा काय अवस्था होईल ते? तसंच असतं, तू तुझं शिक्षण पूर्ण करणं ही एक प्रकारे काळाची गरज आहे. पण तुला एक सांगते.. या शाळेतल्या परीक्षा देणं आयुष्याच्या परीक्षेच्या तुलनेत खूप सोपं आहे रे, तू जर इथेच हार स्वीकार केलीस तर कसं होईल तुझं? तू खरंचरे अगदी मनापासून प्रयत्न केला होतास का?

महेश : (खाली मान घालूनच उत्तर देतो) हो..

आई : झाले तर मग हे बघ माणूस तेवढंच खाऊ शकतो जेवढी त्याला भूक आहे, मग इतकी काळजी करू नकोस परीक्षेची, मला पूर्ण विश्वास आहे माझ्या मुलावर, तू आणखीन एक प्रयत्न कर आणि

सगळ्यात महत्त्वाची गोष्ट, **आयुष्यात येणारे कोणतेही संकट माणसाच्या जीवनापेक्षा जास्त महत्त्वाचं नसतं रे. उलट ही संकटे जर आपल्या जीवनात आलीच नाहीत तर माणसाचे जीवन अगदी निरस होऊन जाईल माहिती आहे..!**

वडील :- आणि जसं एडिसन म्हणाला आहे Single sheet of paper can't decide my future त्यामुळे जास्त विचार करत बसू नकोस, अभ्यासासोबतच असं काहीतरी काम कर जे तुला अगदी मनापासून आवडतं. समजले?

महेश : (मनातले सगळे निराशाजनक विचार दूर झाल्यामुळे खुश होऊनच प्रतिसाद देतो.) हो..

वडील : (महेशला हळूवार टपली मारतच बोलतात) चला झोपा आता... रात्रीचे तीन वाजलेत.. आणि हो... चुकल्यावर पुन्हा प्रयत्न कर याचा अर्थ चूक होण्याची वाट बघ असं होत नाही बरं... प्रत्येकवेळी आयुष्य दुसरी संधी देईल असे काही नाही... चला झोपा.

महेशला घरच्यांनी समजून घेतल्यामुळे आणि योग्य ते मार्गदर्शन मिळाल्यामुळे त्याच्या मनातले नैराश्यपूर्ण विचार गेले आणि शांतपणे तो झोपी गेला.

# गर्भ

रुद्र हॉस्पिटलजवळच एका ढोंगी बाबाला अटक करण्यात आली. गर्भलिंग निदान करण्याचे व हव्या त्या (मुलगा किंवा मुलगी) अपत्याला जन्म देण्यासाठी कोणतीतरी औषधे देण्याचे नाटक तो ढोंगी बाबा करत होता, असे इन्स्पेक्टर प्रभूंनी आमच्या पत्रकाराच्या मुलाखतीत सांगितले.

---

“अरे, पण सूरज, तू असं करू नकोस. तुझी गेल्या पाच वर्षांची मेहनत आहे ती... तू जर तुझे सगळे रिसर्च पेपर्स नष्ट केलेस, तर तुझी सगळी मेहनत वाया जाईल.” “पण सर, जर मी तसं केलं नाही, तर माहीत नाही संपूर्ण मानवजात माझ्या रिसर्चमुळे किती धोक्यात येईल! आणि मला वाटत नाही की आपण सगळे माझ्या रिसर्चमुळे होणारे परिणाम झेलण्यासाठी तयार आहोत.” “अरे, पण का? तुला असं का वाटतं? बरं ठीक आहे, आपण यावर संध्याकाळी चर्चा करूयात. सध्यातरी मी तुझ्या सुटकेसाठी काहीतरी करतो.” डॉ. विनोद डॉ. सूरजसोबत बोलून चौकीतून निघून गेले.

---

“काय रे सूरज, पोलिसांनी बडवलं तर नाही ना तुला?” विनोदने सूरजला हसतच विचारले. “काय सर, तुम्हीपण उगाच चेष्टा करताय!” “ते सगळं जाऊ दे. मला सांग, काय झालं अचानक? तू असा निर्णय का घेतलास? तुला अंदाज आहे, तुझ्या रिसर्चमुळे तुला सगळं जग ओळखू लागेल; तरीसुद्धा तू तुझा रिसर्च नष्ट करण्याचा निर्णय घेतोयस, हे काही मला कळलं नाही.” विनोदच्या घरी दोघांची चर्चा चालू होती.

---

साधारणपणे पाच महिने अगोदर :

“सर, तुम्ही म्हणताय की मी माझी रिसर्च पब्लिश करावी, पण मला याच्या परिणामांचा अंदाज घेण्यासाठी काही काळ हवाय.”

“डॉ. सूरज, तुम्ही या वेषात फारच सुंदर दिसताय बरं...” सूरजला भगव्या कपड्यांमध्ये पाहून डॉ. विनोद त्याची चेष्टा करत होते.

डॉक्टर सुरजच्या सुटकेनंतर डॉक्टर विनोद च्या घरी:

“सर, ज्याप्रमाणे आपली योजना होती, त्याप्रमाणे मी मागच्या जवळपास ४ महिन्यांपासून साधूचा वेष घेऊन आपल्या मॅटरनिटी हॉस्पिटलजवळच एक खोली घेऊन राहू लागलो. 'माझ्या आशीर्वादाने मुलगा किंवा मुलगी हवी हे तुम्ही ठरवू शकता', अशी बातमी आपल्या हॉस्पिटलमध्ये तपासायला येणाऱ्या पेशंट्सपर्यंत पोहोचवण्याची सोय

केली. माझ्याकडे आलेल्या श्रद्धाळूंचे तपशील (Details) व त्यांच्या निवडीची नोंद घेऊन मी हे रिपोर्ट्स तयार केले." असे म्हणत डॉ. सूरजने आपल्याकडचे रिपोर्ट्स डॉ. विनोद यांच्याकडे दिले.

"पण काहीही म्हण सूरज, तुझी या प्रकारचा सर्व्हे करण्याची कल्पना मात्र आवडली बरं मला..." असे म्हणत म्हणत डॉक्टरांनी रिपोर्ट्स पाहायला घेतले. "हम्म... तुझे रिपोर्ट्स पाहून तरी असं वाटतंच आहे की तू घेतलेला निर्णय बरोबर आहे. तरीपण मला असं वाटतं की तू एकदा व्यवस्थित विचार कर. शेवटी तुझं गेल्या पाच वर्षांचं काम आहे ते." "हो सर, पटतंय मला तुमचं म्हणणं, पण माझा निर्णय अटळ आहे. तुम्ही पाहू शकता की गेल्या जवळपास ४ महिन्यांमध्ये माझ्याकडे एकूण १८६४ जोडपी 'आपल्याला हवंच तेच अपत्य व्हावे' या इच्छेने आली. 'मुलगा हवा की मुलगी' या निर्णयाबद्दलचा रिपोर्ट पाहिला तर तुमच्या लक्षात येईल की, त्या जोडप्यांपैकी १३९१ जोडप्यांनी 'आपल्याला मुलगाच व्हावा' अशी इच्छा व्यक्त केली. आपण जर याची टक्केवारी काढली, तर ती ७४ ते ७५ टक्के होते. असं असताना तुम्ही म्हटल्याप्रमाणे मी जर माझा रिसर्च जगासमोर आणला, तर पुढच्या पिढीत एका मुलीमागे ३ मुले असतील."

"पण सूरज, तुझ्या रिसर्चचा वापर एका मर्यादित (Restricted) प्रमाणातच होईल... नाही?"

“कदाचित... पण आपल्याला त्याची शाश्वती देता येणार नाही. जरी आपण असं गृहीत धरून चाललो की वापर मर्यादित असेल आणि गरजेपुरताच केला जाईल, तरी तेसुद्धा एकप्रकारे चुकीचंच होईल. तसंही आपण नक्की नाही सांगू शकत की ते निर्बंध किती दिवस पाळले जातील, तसही माणसाला जर त्याच्या पात्रता आणि त्याची जवाबदारी घेण्याची क्षमता न पाहता जर अशी research त्याच्या हाती देणं म्हणजे दारू पाजलेल्या माकडाच्या हाती दुधारी शस्त्र देऊन त्याला आपलं रक्षण कर असं म्हणल्याप्रमाणेच आहे हे मानवजातीने वेळोवेळी सिद्धच केलेलं आहे, त्यामुळे मला वाटतं की मी घेतलेला निर्णय योग्य आहे.”

“ठीक आहे तर मग, जशी तुझी इच्छा! पण मला एक सांग, तू तुझ्याकडे आलेल्या जोडप्यांना जे औषध दिलेस, त्याचं काय?” “त्याची काळजी करायची गरज नाहीये सर. मी फक्त ज्यांना मुलगी हवी होती, त्यांनाच औषध दिले होते, माझं असं करणे किती बरोबर किंवा चुकीचं आहे हा विषय वादाचा असू शकतो, पण त्यातल्या त्यात इतिहासात जितक्या स्त्रियांना त्या फक्त स्त्रिया आहेत म्हणून त्यांचा जीव गमवावा लागला आहे ते पाहता मी तो चुकीचा निर्णय असला तरी मी... जाऊद्या.. कदाचित...” डॉ. सुरज हसत जरी हे सगळं बोलत असले तरी त्यांच्या चेहऱ्यावर एक गंभीरभाव तरळून गेला.

काही क्षण दोघांमध्ये शांतता पसरली. विनोदने सूरजच्या चेहऱ्यावरचा तो गंभीर भाव टिपला. “सूरज, तुला काय झालं? असं

अचानक गप्प का झालास?” सूरजने एक दीर्घ श्वास घेतला. “सर, तुम्हाला माहितीय, माझ्या आईला मी नववीत असताना एक मुलगी होणार होती. पण आजीच्या हट्टापायी... तिसऱ्याच महिन्यात तो गर्भ पाडला गेला. आई त्यानंतर कधीच पहिल्यासारखी हसली नाही. मी लहान होतो, पण तिच्या डोळ्यांतली ती पोकळी मला आजही आठवते. त्या दिवसापासून मनात एक प्रश्न घर करून बसलाय— माझ्याच रक्तामांसाची एक बहीण, फक्त 'मुलगी' आहे म्हणून जगाच्या उंबरठ्यावरही पोहोचू शकली नाही. आणि आता मी जर हेच शस्त्र आणखी सोप्या पद्धतीने जगाच्या हातात दिलं, तर उद्या आणखी कितीतरी आयांच्या डोळ्यांत तीच पोकळी उतरेल.” सूरजचा आवाज क्षणभर कातर झाला, पण लगेच त्याने स्वतःला सावरले.

“हो का... तेवढं तर बरं! आणि मग जी कपल्स तुझ्याकडे 'मुलगाच झाला पाहिजे' या इच्छेने येत होती, त्यांचं काय? म्हणजे, तू त्यांना प्रसाद म्हणून किंवा औषध म्हणून काय देत होतास?” “मी त्यांना प्रसाद म्हणून बुंदीचे लाडू द्यायचो...” डॉ. सूरजने हसतच डॉ. विनोदला टाळी दिली.

त्या रात्री उशिरा, विनोदच्या घराच्या गच्चीवर एका छोट्या शेकोटीत सूरजने आपल्या पाच वर्षांच्या मेहनतीचा प्रत्येक कागद, प्रत्येक फॉर्म्युला, प्रत्येक निष्कर्ष एक एक करून टाकायला सुरुवात केली. विनोद शांतपणे बाजूला उभा राहून ती राख होणारी मेहनत पाहत होता. “खरंच काहीच ठेवणार नाहीयेस का, सूरज? निदान

एखादी प्रत तरी...” “नाही सर. एकदा एखादी गोष्ट अस्तित्वात असली, की ती कधी ना कधी चुकीच्या हातात पडतेच. आजच्या पेपरमध्ये त्या ढोंगी बाबाची बातमी वाचली ना तुम्ही? गंमत आहे—लोकांना वाटतंय की तो बाबा फसवणूक करत होता. पण खरं तर, गेल्या चार महिन्यांत त्याने जे केलं, तेच कदाचित या देशातल्या हजारो न जन्मलेल्या मुलींना वाचवणारं खरं काम होतं.” शेवटचा कागद जळून राख होईपर्यंत दोघेही तसेच शांत उभे राहिले. गच्चीवरून खाली, रुद्र हॉस्पिटलच्या दिशेने एक ॲम्ब्युलन्स सायरन वाजवत जाताना दिसत होती—कुणाच्या तरी घरी आज एक नवा जीव जन्माला येणार होता, मुलगा असो वा मुलगी, हे आता निदान इथे तरी फक्त निसर्गाच्याच हातात होतं.

# एकतर्फी

राकेश अंधारात बसून ऋतुजासाठी रडत होता. त्याला स्वतःचा राग येत होता; मध्येच ऋतुजाने त्याचा एकदातरी विचार करायला हवा होता, असं त्याला वाटत होतं... रात्रीचे ३ - ३:१५ झाले होते. राकेश रडत-रडतच झोपी गेला.

---

"किती सुंदर आहे ना ही पोरगी?" अजय कॉलेजच्या गेटमधून आत येणाऱ्या मुलीकडे पाहत राकेशला म्हणाला... राकेश त्याच मुलीकडे मंत्रमुग्ध झाल्यासारखा बघत होता; अजयच्या बोलण्याकडे त्याचे लक्ष सुद्धा नव्हते.

"ऋतुजा!" नकळतपणे राकेशच्या तोंडातून तिचे नाव आले.

"साल्या, तुम्ही ओळखता एकमेकांना?" अजय राकेशला विचारत होता, पण राकेश मात्र स्वतःच्याच तंद्रीत हरवलेला पाहून अजयने राकेशला टपली मारून ताळ्यावर आणले.

"अरे, मी विचारलं, तुम्ही ओळखता का एकमेकांना?" अजय म्हणाला.

"अं... हो... चल!" राकेश पळतच ऋतुजाजवळ पोहोचला; त्याच्या मागे-मागे अजयही आला.

"अरे... राकेश ना रे तू?" ऋतुजाने राकेशला पळत येताना पाहून काहीसे आठवतच प्रश्नार्थक मुद्रेने विचारले.

"हो मग... मीच... मित्र आहे म्हणावं लक्षात! मला वाटलं विसरली असेल मला..." राकेश म्हणाला.

"असं कसं होईल जाड्या... बराच हँडसम झालास की!" ऋतुजा म्हणाली.

"अजय, ही माझी बालमैत्रीण, ऋतू... ऋतुजा!" राकेशने ओळख करून दिली.

"हाय, मी अजय!" अजय ऋतुजाशी हातमिळवत म्हणाला.

राकेश आणि ऋतू दोघांची घरे जवळजवळ होती. त्यात दोघेही पाचवी ते दहावी एकाच शाळेत, एकाच इयत्तेत पण वेगवेगळ्या तुकडीत शिकत होते. रोज एकमेकांसोबत शाळेत जाणे, सोबत डबा खाणे असा दिनक्रम असल्याने दोघांची मैत्री अगदी घट्ट झालेली. नंतर ऋतुजाच्या वडिलांची बदली झाली आणि त्यांचा परिवार नाशिकमध्ये शिफ्ट झाला.

"खरं सांगू राकेश! ज्यावेळी आम्ही नाशिकमध्ये शिफ्ट झालो, मला खूप आठवण आली... आय मीन, आपल्या शाळेची, पुण्यात घालवलेला वेळ, मित्र-मैत्रिणी सगळ्यांचीच खूप आठवण यायची... कित्येक दिवस मला तिकडच्या शाळेत करमलंच नाही.... पण हळूहळू सवय होत गेली, आठवणींवर काळाचा पडदा पडला आणि मी तिथे

रमले...." चहाच्या टपरीवर चहा पिताना ऋतुजा अजय आणि राकेशसोबत बोलत होती.

"हो का...? बरं... आणि माझी? माझी आठवण नाही आली कधी?" राकेशने विचारले.

"नाही रे, तुझी आठवण का येईल मला? ना आपण लहानपणी कधी सोबत खेळलो, ना सोबत कधी वेळ घालवला, ना कधी सोबत अभ्यास केला, मग कशाला उगाच आठवण येईल मला तुझी..." ऋतुजा खट्याळपणे हसत-हसत म्हणाली.

"अच्छा... म्हह... बरोबर आहे... कशाला आठवण येणार! तुला माहिती आहे, मला तर अशी कोणती मैत्रीण आहे माझी, हेसुद्धा लक्षात नव्हतं..." असं म्हणत राकेशने अजयला टाळी दिली.

"बाय द वे, आपल्या अजय साहेबांनासुद्धा चित्रकलेची आवड आहे बरं... तुला सांगतो अजय, काय भन्नाट चित्र काढते ऋतू!" राकेश म्हणाला.

"हो... का...! अरे वाह, छानच आहे की... मला तसं इतकं चांगलं चित्र काढायला जमत नाही, पण आवड आहे तर प्रयत्न करत राहतो." अजय म्हणाला.

"बरं, चल मी निघतो राकेश... माझी ती वाट पाहत असेल..." अजय म्हणाला.

"ह्म्म... ह्म्म... गर्लफ्रेंड आहे वाटत! अरे मग बोलाव ना तिला इकडेच, त्या निमित्ताने माझी ओळख तरी होईल..." ऋतुजा म्हणाली.

"अगं ए येडे, त्याच्या बाईकबद्दल बोलतोय तो..." राकेश ऋतुजावर हसत म्हणाला.

---

"ए विन्या, हा आपला राकेश म्हणतोय, मला वाटतं मला प्रेम झालंय..." अजय विनोदची चेष्टा करत सांगत होता. गेल्या दोन-अडीच वर्षांत अजय, राकेश, विनोद आणि ऋतू अगदी जिव्हाळ्याचे मित्र झाले होते. विनोद फ्रेशर्स पार्टीनंतर तिघांच्या टोळीत सामील झाला होता.

"मी सिरियस आहे यार.... खरंच कोणीतरी आहे माझ्या मनात, जिच्यावर मी खूप प्रेम करतो, पण..." राकेश बोलता-बोलता थांबला.

"मला माहीत आहे रे.... आणि मला हे सुद्धा माहीत आहे की ती मुलगी कोण आहे..." अजय गंभीरतेने राकेशच्या खांद्यावर हात ठेवत म्हणाला.

"काय रे, ए! मला सोडून तुम्ही आपल्या अड्ड्यावर काय करताय? आणि साहेबांना काय झालं? ए राख्या, काय झालं रे, तोंड का पाडलंस?" ऋतुजाने येऊन विचारले.

"अगं, काही नाही. मी म्हटलं की नेक्स्ट वीक मध्ये सलग दोन दिवस सुट्टी आहे, तर कुठेतरी नाईट आउटला जाऊ तर..." विनोदने विषय बदलून सांगितला.

"माकडा, तुला माहित नाही का, त्याचा बारका भाऊ एकटा असतो, त्यामुळे तो इच्छा असूनही... डोन्ट वरी बॉस, अपन तेरे लिए वन डे ट्रीप निकालेंगे... अब तो खुश..?" ऋतुजाने मूड हलका करण्यासाठी टपोरी स्टाईलमध्ये समजूत काढली.

"जर तू पाणीपुरी चारत असली आज तर, खुश..." ऋतुजाकडे बघून राकेश नाटकी हसत बोलला.

"बस क्या, दोस्तों को खुश करने के लिए इतना तो करेगी ही हमारी ऋतू... आंडू-पांडू समझा क्या!" अजय राकेश आणि विनोदला टाळी देत सुरात सूर मिसळत म्हणाला.

"ए, चला मी निघते, मला क्लासला जायला उशीर होईल नाहीतर!" ऋतुजा पाणीपुरीवाल्याला पैसे देऊन काढता पाय घेत म्हणाली.

"एक विचारू राकेश? म्हणजे तू अजयला बोलला असशील, पण मला वाटतं तीच आहे? हो ना?" ऋतुजा गेल्यानंतर विनोद मुळ मुद्द्यावर येत म्हणाला.

"मी अजयला सुद्धा बोललो नाहीये यावर आणि तसुद्धा मला वाटतंय तुमचा गैरसमज होतोय," राकेश म्हणाला.

"काय गैरसमज होतोय आमचा? घाबरू नकोस रे, प्रपोज करून टाक तू ऋतूला... तसही तुला ती आवडते... नकार नाही देणार ती तुला," अजय म्हणाला.

"हा भाई, मला असं वाटतं.... त्यातल्या त्यात आपलं शेवटचं वर्ष आहे... मला पण असं वाटतं की तू प्रपोज कर तिला... तसं तर मी वेळ मारून नेण्यासाठी बोललो ट्रिपबद्दल, पण असं वाटतंय खरंच वन डे ट्रिप प्लॅन करावी लागेल... एक काम करू, सोमवारची प्लॅन करू." विनोदने अजयच्या म्हणण्याला दुजोरा दिला.

"पण मी ऋतूबद्दल बोलत नाहीये." राकेशच्या या वाक्यावर दोघेही त्याच्याकडे आश्चर्यचकित होऊन बघत होते.

"ऋतुजावर प्रेम नाही करत तू? मग कोणावर प्रेम करतोस तू?" अजयने विचारले.

"अनुजा... मी अनुजावर प्रेम करतो; ऋतू माझी फक्त मैत्रीण आहे..."

---

असं का केलं ऋतूने... का सोडून गेली ती आम्हाला सगळ्यांना... राकेश अंधारात बसून ऋतुजासाठी रडत होता. त्याला स्वतःचा राग येत होता; मध्येच ऋतुजाने त्याचा एकदातरी विचार करायला हवा

होता, असं त्याला वाटत होतं... दूरून पाहिलेले ऋतुजाचे पार्थिव त्याच्या डोळ्यांसमोरून जात नव्हते.... रात्रीचे ३ - ३:१५ झाले होते. डोक्यावर आलेला ताण, मनाला आलेला क्षीण आणि आयुष्यभराची खंत घेऊन राकेश रडत-रडतच झोपी गेला.

---

"काय केलं मी हे... माझ्या स्वतःच्या बहिणीसोबत... खूप मोठी चूक झाली माझ्याकडून... माझी अनु...

अशी कशी करू शकते मी तिच्यासोबत... तिचा तर काही दोष नव्हता यात.." ऋतूला तिच्याच कृत्याचा राग येत होता. आपण असं कसं करू शकतो आपल्या बहिणीसोबत, कसं काय तिच्या जीवावर उठू शकतो? पण आता हा सगळा विचार करण्यात काही अर्थ नव्हता; जे व्हायचे ते झाले होते. ऋतूला माहीत होते, तिच्याकडून घडलेला अपराध तिला स्वस्थपणे जगू देणार नाही... अपराधबोधात जगण्यापेक्षा तिला स्वतःला संपवणे जास्त सोपे होते, आणि तिनेही तेच केले... कपाटात असलेल्या बाबांच्या झोपेच्या गोळ्यांची डबी रिकामी केली..

---

"तुमची मुलगी ससून हॉस्पिटलमध्ये आहे... तुम्ही लवकर इथे पुलगेट पोलीस ठाण्यात हजर व्हा..." नुकत्याच स्वतःच्या मोठ्या

मुलीचा अंतिम संस्कार करून आलेल्या विनायकरावांना पोलिसांचा फोन आल्यामुळे ते तडक पोलीस स्टेशनला निघाले...

"तुमची मुलगी अनुजा... अजूनही शुद्धीवर आलेली नाहीये... नशिबाने वाचलीये ती... पुलगेटजवळच्या कॅनॉलमध्ये वाहत चालली होती, एका माणसाने तिला बाहेर काढले व आम्हाला खबर दिली... आम्हाला संशय आहे की, तुमच्या मोठ्या मुलीच्या आत्महत्येचा आणि तुमची दुसरी मुलगी अशी सापडणे यात नक्की काही ना काही संबंध आहे... आम्ही तिची साक्ष घेतल्याशिवाय कोणालाही तिला भेटता येणार नाही... आम्हीही माणूस आहोत, तुमच्या मनाची अवस्था समजू शकतो, पण आमचाही नाइलाज आहे... मी तुमच्याकडून सहकार्याची अपेक्षा करतो..." इन्स्पेक्टर वाघमारे यांनी विनायकरावांना सांगितले.

आठ वर्षांपूर्वी हृदयविकाराच्या झटक्याने सुशिला म्हणजेच त्यांची पत्नी गेल्यानंतर या दोघीच त्यांच्या जगण्याचे कारण बनल्या होत्या आणि आता तर विनायकरावांची उमेदच हरवली होती... आपल्या मोठ्या पोरीने आत्महत्या का केली, एकीकडे हा प्रश्न आणि आपल्या दुसऱ्या मुलीसोबत नक्की काय घडले, हा प्रश्न... विनायक राव पूर्ण खचून गेले होते...

"अभ्यासाचं टेन्शन आल्यामुळे मन मोकळं करण्यासाठी ती कॅनॉलकिनारी एकटी फिरत असताना तिचा पाय घसरून ती पाण्यात पडली, अशी तुमच्या मुलीने साक्ष दिली आहे... तुम्हाला काय म्हणायचं आहे यावर?" वाघमारे यांनी विनायकरावांना विचारले.

"मला नाही माहित, पण हो, ती टेन्शन वगैरेमध्ये असली की ती कॅनॉलजवळ फिरायला जायची." विनायकरावांनी सांगितले.

"ह्म्म.... तुमचं म्हणणं लक्षात घेतलं तर तिची साक्ष खरी असण्याची शक्यता नाकारता येत नाही.." वाघमारे म्हणाले.

---

सहा महिन्यांपूर्वी

"पण तीचं माझ्यावर प्रेम आहे की नाही, हे कळणार कसं?" राकेश म्हणाला.

"मला माहिती आहे रे, तू ताईवर लहानपणापासून प्रेम करतोस... पण तुला माहीतच आहे की, तिला काय वाटतं एखाद्याबद्दल, हे ती स्वतः व्यक्त करत नाही, त्यामुळे तू प्रत्यक्ष तिलाच का विचारत नाही?" अनुजा म्हणाली.

"इच्छा तर माझी पण आहे ग, अनु, पण भीती वाटते... जर तिने नकार दिला तर? किंवा आमची मैत्री..." राकेश म्हणाला.

"असं काही होणार नाही..." अनु म्हणाली.

"असं कशावरून म्हणू शकतेस तू? यार, मला नकार दिला तर कदाचित मी तिची लाईफ, तिचा निर्णय आहे असं समजवेन स्वतःला, पण जर माझ्या प्रपोजलमुळे आमच्या मैत्रीला धक्का लागला, तर हे सहन नाही करू शकणार मी.." राकेश म्हणाला.

"मी काही अंदाज बांधता येतोय का, बघू का ताईशी बोलून?" अनु म्हणाली.

"प्लीज ग, जर अंदाज आला तर बरं होईल..." राकेश म्हणाला.

"ताई, ऐक ना.." अनु म्हणाली.

"ह्म्म, बोल.." ऋतू म्हणाली.

"ओरडायचं नाही हा.." अनु म्हणाली.

"ह्म्म... म्हणजे परत काहीतरी केलं वाटतं तू... बरं सांग, ओरडायचं का नाही, ते मी ऐकून ठरवीन..." ऋतुजा म्हणाली.

"तुला काय वाटतं?" अनुजा काहीशी लाजत-लाजत बोलली.

"कशाबद्दल? आणि असं लाजायला काय आहे?" ऋतू म्हणाली.

"अगं, म्हणजे ते... असं..." अनु म्हणाली.

"हे बघ, विचारायचं असेल तर विचार, नाहीतर गप्प बस. उगाच मला त्रास देऊ नकोस, असाइनमेंट पूर्ण करायची आहे मला," ऋतुजा चिडतच म्हणाली.

"बरं, मी डायरेक्ट विचारते, पण रागवायचं नाही आणि खरं-खरं सांगायचं बरं.." अनुजा म्हणाली.

"तू विचारणार आहेस का आता?" ऋतू म्हणाली.

"तुला कोणी पोरगा आवडतो का ग?" हे विचारल्यावर आता ताई काय म्हणेल, याची भीती आणि उत्सुकता दोन्ही अनुजाच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते.

"ह्म्म, हे विचारायचं होतं म्हणून एवढी घाबरत होतीस का! नाही ग, असा विचारच केला नाही मी कोणाबद्दल.... आणि तसही काय उपयोग त्याचा... मला नाही आवडत, कोणी सिरीयस होत नाही, फक्त नावालाच 'मी काहीही करू शकतो तुझ्यासाठी, आय लव्ह यू' वगैरे... उगाच फालतूपणा करण्यात कोण वेळ घालवणार..." ऋतुजा म्हणाली.

"हा, ते पण खरंच आहे म्हणा... पण जर समजा तुला कळालं की, कोणी तुझ्यावर खरोखर प्रेम करतो, तर, तर काय करशील?" अनु म्हणाली.

"तसं जर खरंच कोणी असेल आणि मला खरेपणाची खात्री असेल, तर नक्कीच विचार करेन मी." ऋतुजा म्हणाली.

"अच्छा.. म्हणजे कोणी नाहीये, पण असू शकतो, फक्त प्रामाणिक पाहिजे, तसंच ना?" अनु म्हणाली.

"हो, पण काय झालं अचानक हे असलं खुळ कुठून आलं तुझ्या डोक्यात? का विचारलं मला?" ऋतुजा म्हणाली.

"काही नाही ग, सहज विचारलं, ती निशा नाही का, ती तिच्या बीएफबद्दल सांगत होती दुपारी, म्हणून सुचलं..." अनुजा म्हणाली.

"पक्का?" ऋतुजा म्हणाली.

"हो ग..." अनुजा म्हणाली.

---

"मी काल विचारलं ताईला.." अनु म्हणाली.

"मग काय म्हणाली ती, आवडतो का मी तिला?" राकेशने विचारले.

"ए बाबा, असं काही नाही विचारलं मी... काय येडा आहे का?" अनु म्हणाली.

"मग, काय विचारलं तू?" राकेशने काहीशा उदास सुरात विचारले.

"हे बघ, मी काही तिला डायरेक्ट नाही विचारू शकत, पण हा एक पक्कं आहे की, तिच्या मनात कोणी नाहीये, पण एक चांगलं आहे की ती प्रेम वगैरेच्या विरोधात नाहीये, फक्त तिला कोणी तिच्या मनासारखा भेटला नाही, इतकंच.." अनु म्हणाली.

"ह्म्म.. कठीण आहे.." राकेशने सुस्कारा सोडला.

---

मागच्या सहा महिन्यांत अनुच्या सतत डिवचत राहण्यामुळे आणि राकेशच्या प्रामाणिक पण प्रेमळ वागण्याने कुठेतरी ऋतुजाच्या मनात राकेशसाठी प्रेम फुलायला लागले होते...

"मी प्रपोज करू का राकेशला?.. नको, नको.. जर तो फक्त जवळची मैत्रीण म्हणून माझ्याशी चांगला वागत असेल, तर काय वाटेल माझ्या प्रपोजलचे... अनुला सांगू का, त्याच्या मनात काय आहे हे काढून घ्यायला? नको, नाहीतर तसही ते दोघेजणसुद्धा चांगले मित्र आहेत, उगाच मनातलं काढून घ्यायच्या नादात तिने राकेशला सांगितले तर!" ऋतुजा स्वतःसोबतच प्रश्नोत्तरांच्या खेळात गुंगळी होती...

---

"हा ऋतू, काय झालं अचानक आम्हाला आपल्या अड्ड्यावर बोलवण्याऐवजी का इथे बोलवलं?" अजय आणि विनोदला ऋतूने जंगली महाराज रस्त्यावरील बाबू कॅफेमध्ये बोलावलं होतं...

"आधी प्रॉमिस करा दोघांनी की, आपल्यात जे काही बोलणं होईल, ते तुम्ही कोणालाच सांगणार नाही..." ऋतू म्हणाली.

"ए यार ऋतू... आधी काय सांगायचंय ते तर सांग, तसही आपल्या चौघांमधले सिक्रेट आपण कोणाला शेअर करतो का? नाही ना... मग..." विनोद म्हणाला.

"डफर... कोणाला नाही म्हणजे कोणालाच नाही... अगदी राकेशला सुद्धा नाही.." ऋतुजा म्हणाली.

"पण का.... राकेशला सुद्धा नाही..." अजयने विचारले.

"नाही.... त्याला सुद्धा नाही... जर सांगायचेच असते तर मी त्यालाही बोलावले नसते का! तुम्ही प्रॉमिस करणार असाल तर सांगते... नाहीतर नाही.... करताय ना प्रॉमिस?" ऋतुजाने विचारले.

अजय आणि विनोदने एकमेकांना डोळ्यांनीच मूकसंमती दिली आणि ऋतुजाने तिच्या मनात राकेशबद्दल असलेल्या भावना व्यक्त केल्या आणि त्याच्या मनात काय आहे याबद्दल जाणून घ्यायला मदत करण्यासाठी विचारले.

"पण ऋतू, जर त्याच्या मनात काही नसले तुझ्याबद्दल तर?" अजयने विचारले.

"तर काय... तसही काय करू शकते मी.." ऋतुजा म्हणाली.

"आणि जर त्याच्या मनात असली तू? तर आम्हाला पार्टी पाहिजे हा..." अजयच्या प्रश्नामुळे ऋतूचा पडलेला चेहरा पाहून मूड हलका करण्यासाठी विनोद बोलला.. यावर ऋतू मनोमन खुश झाली....

---

एक आठवड्यानंतर

"ए विन्या, हा आपला राकेश म्हणतोय, मला वाटतं मला प्रेम झालंय..." अजय विनोदची चेष्टा करत सांगत होता... गेल्या दोन-अडीच वर्षांत अजय, राकेश, विनोद आणि ऋतू अगदी जिव्हाळ्याचे मित्र झाले होते..

"मी सिरीयस आहे यार.... खरंच कोणीतरी आहे माझ्या मनात, जिच्यावर मी खूप प्रेम करतो, पण..." राकेश बोलता-बोलता थांबला.

"मला माहीत आहे रे.... आणि मला हे सुद्धा माहीत आहे की ती मुलगी कोण आहे..." अजय गंभीरतेने राकेशच्या खांद्यावर हात ठेवत म्हणाला...

"काय रे, ए! मला सोडून तुम्ही आपल्या अड्ड्यावर काय करताय? आणि साहेबांना काय झालं? ए राख्या, काय झालं रे, तोंड का पाडलंस?" ऋतुजाने येऊन विचारले.

"अगं, काही नाही. मी म्हटलं की नेक्स्ट वीक मध्ये सलग दोन दिवस सुट्टी आहे, तर कुठेतरी नाईट आउटला जाऊ तर..." विनोदने विषय बदलून सांगितला...

"माकडा, तुला माहित नाही का, त्याचा बारका भाऊ एकटा असतो, त्यामुळे तो इच्छा असूनही... डोन्ट वरी बॉस, अपन तेरे लिए

वन डे ट्रीप निकालेंगे... अब तो खुश..?" ऋतुजाने मूड हलका करण्यासाठी टपोरी स्टाईलमध्ये समजूत काढली...

"जर तू पाणीपुरी चारत असली आज, तर खुश..." ऋतुजाकडे बघून राकेश नाटकी हसत बोलला...

"बस क्या, दोस्तों को खुश करने के लिए इतना तो करेगी ही हमारी ऋतू... आंडू-पांडू समझा क्या!" अजय राकेश आणि विनोदला टाळी देत सुरात सूर मिसळत म्हणाला.

"ए, चला मी निघते, मला क्लासला जायला उशीर होईल नाहीतर!" ऋतुजा पाणीपुरीवाल्याला पैसे देऊन काढता पाय घेत म्हणाली..

"एक विचारू राकेश? म्हणजे तू अजयला बोलला असशील, पण मला वाटतं तीच आहे? हो ना?" ऋतुजा गेल्यानंतर विनोद मुळ मुद्द्यावर येत म्हणाला...

"मी अजयला सुद्धा बोललो नाहीये यावर आणि तसुद्धा मला वाटतंय तुमचा गैरसमज होतोय," राकेश म्हणाला..

"काय गैरसमज होतोय आमचा? घाबरू नकोस रे, प्रपोज करून टाक तू ऋतूला... तसही तुला ती आवडते... नकार नाही देणार ती तुला," अजय म्हणाला.

"हा भाई, मला असं वाटतं.... त्यातल्या त्यात आपलं शेवटचं वर्ष आहे... मला पण असं वाटतं की तू प्रपोज कर तिला... तसं तर मी वेळ मारून नेण्यासाठी बोललो ट्रिपबद्दल, पण असं वाटतंय खरंच वन डे ट्रिप प्लॅन करावी लागेल... एक काम करू, सोमवारची प्लॅन करू." विनोदने अजयच्या म्हणण्याला दुजोरा दिला.

"पण मी ऋतूबद्दल बोलत नाहीये." राकेशच्या या वाक्यावर दोघेही त्याच्याकडे आश्चर्यचकित होऊन बघत होते.

"ऋतुजावर प्रेम नाही करत तू? मग कोणावर प्रेम करतोस तू?" अजयने विचारले.

"अनुजा... मी अनुजावर प्रेम करतो; ऋतू माझी फक्त मैत्रीण आहे... आणि तसुद्धा अनुने मला एकदा प्रपोज सुद्धा केलं होतं, पण मी त्याकडे दुर्लक्ष केलेलं..." राकेशने दोघांची फिरकी घ्यायच्या उद्देशाने बोलला, पण त्याला माहीत नव्हते की, ऋतुजा बाजूच्या टपरीआड लपून त्यांचे बोलणे ऐकत होती...

राकेश परत अजय आणि विनोदच्या चेहऱ्यावरचे भाव बघून हसायला लागलेला आणि "हो रे, ऋतुजावरच प्रेम आहे, पण तिला प्रपोज करायची भीती वाटते," हे बोलला, पण त्याआधीच ऋतुजा रडत-रडत दुसऱ्या बाजूने निघून गेली होती...

---

'राकेश माझा मित्र आहे आणि जर त्याचं अनुजावर प्रेम आहे, तर मग माझ्यासोबत इतकी जवळीक करून का वागतो? माझ्यासमोर अनुजा आणि राकेश दोघेही फक्त मित्र असल्यासारखे वागतात.. तो माझ्यासोबत तिच्यापेक्षा चांगला आणि क्लोज राहतो, मग असं का? अनुजा: "राकेशचं मी अनुजावर प्रेम करतो, ऋतू माझी फक्त मैत्रीण आहे..." हे ऐकल्यावर तर जणू तिच्यावर आभाळ कोसळले होते... तिला राकेश आणि अनुजाच्या वागण्याचा राग येत होता.... मेलीने त्याला प्रपोज केलं होतं, तर मग मला त्यांच्याबद्दल विचार करायला का लावायची... का मला त्याच्या नावाने डिवचायची?' तिच्या मनात दोघांबद्दल राग, तिरस्कार निर्माण झाला होता... 'हिला तर जाब विचारलाच पाहिजे,' असा निर्धार करून ऋतूने अनुजाला फोन केला....

"अनु... मला तुझ्याशी महत्त्वाचं बोलायचंय, आत्ताच्या आत्ता मला कॅनॉलपाशी भेट..."

"अगं ताई, पण.." अनु काही बोलणार, त्याआधीच ऋतुजाने फोन कट केला... नक्कीच काहीतरी घडलंय, त्याशिवाय असं नाही करणार ताई, असा विचार करून अनुजा कॅनॉलकडे निघाली....

---

अनुजाने कॅनॉलपाशी येऊन ऋतुजा कुठे आहे, ते शोधले. ऋतुजा कॅनॉलपाशी आल्यावर जिथे बसायची, आज त्यापेक्षा थोडी जास्तच पलीकडे स्वतःशीच काहीतरी बडबडत अगदीच काठावर बसली होती..... ऋतुजाच्या पाठीशी जाऊन अनुजाने तिच्या रागाने थरथरणाऱ्या खांद्यावर हात ठेवला.

"काय झालं ताई, अशी थरथरत का आहेस?" अनुजाचा आवाज ऐकून ऋतूचा पारा आणखीनच चढला... तिचं डोकं अगदीच जड झालं, मनावर दडपण आलं... ऋतू उठली, अनुजाला चार शिव्या देत तिच्या अंगावर धावून गेली आणि... आणि रागाच्या भरात अनुजाला धक्का दिला... सगळं इतक्या क्षणार्धात झालं होतं, असं की अनुजाला कळण्याच्या आधीच ऋतूने तिला कॅनॉलमध्ये ढकलून दिले होते...

अनुजाला कॅनॉलमध्ये स्वतःला वाचवण्यासाठी धडपडताना पाहून काय माहीत, पण ऋतुजाला थोडं बरं वाटलं; ती तशीच घराकडे निघाली.... ऋतुजा रागारागाने पण आसुरी आनंदात घराकडे निघाली खरी, पण घरी पोहोचेपर्यंत हळूहळू तिचा राग शांत झाला आणि आपल्या हातून काय घडलंय, याचा अपराधबोध तिला झाला..... पण आता तिच्या हातात काही राहिलं नव्हतं; जे घडायचे ते झाले होते... ती घरी गेली आणि दार आतून बंद करून धायमोकलून रडायला लागली....

"काय केलं मी हे... माझ्या स्वतःच्या बहिणीसोबत... खूप मोठी चूक झाली माझ्याकडून... माझी अनु... मी...

अशी कशी करू शकते मी तिच्यासोबत... तिचा तर काही दोष नव्हता यात.." ऋतूला तिच्याच कृत्याचा राग येत होता. आपण असं कसं करू शकतो आपल्या बहिणीसोबत, कसं काय तिच्या जीवावर उठू शकतो? पण आता हा सगळा विचार करण्यात काही अर्थ नव्हता; जे व्हायचे ते झाले होते... ऋतूला माहीत होते, तिच्याकडून घडलेला अपराध तिला स्वस्थपणे जगू देणार नाही... अपराधबोधात जगण्यापेक्षा तिला स्वतःला संपवणे जास्त सोपे होते, आणि तिनेही तेच केले... कपाटात असलेल्या बाबांच्या झोपेच्या गोळ्यांची डबी रिकामी केली...

# शेवटची भेट

संध्याकाळ व्हायला आली होती. सूर्याची शेवटची किरणे निळ्या आकाशाला स्पर्श करत त्याला जणू निरोप देत होती; वाऱ्यांमध्ये एक थकवा जाणवत होता, जसे की दिवसही आपला प्रवास पूर्ण करून विसाव्याच्या दिशेने चालला होता. शहरापासून काही अंतरावर, एका जुन्या हवेलीच्या लहानशा अंगणात, एक वृद्ध माणूस 'राघू' एका जुन्या खुर्चीवर बसला होता. त्याचे आयुष्यही अगदी आजच्या संध्याकाळसारखे शेवटच्या घटिका मोजत होते.

राघू एकेकाळचा प्रसिद्ध कवी आणि शायर, मनातले क्लिष्ट भाव - भावना देखिल आपल्या शब्दातून सहजपणे मांडणे हे त्याच्या कवितांचे आणि त्याने केलेल्या शायरी चे वैशिष्टयच होते, पण आज ते शब्दही कदाचित त्याच्यासोबत शांत व्हायला आले होते. त्याने आपल्या आयुष्यात खूप प्रेम पाहिले, मैत्री पाहिली आणि वेदनाही अनुभवल्या. पण आज त्याच्याकडे फक्त आठवणीच उरल्या होत्या, आयुष्याच्या प्रवासात धूसर होत जाणाऱ्या, पण खोलवर रुजलेल्या.. आठवणी.

अचानक, दारावर एका हलक्याशा थापाचा आवाज झाला. राघूने आपले डोळे उघडले आणि पाहिले, समोर एक जुना मित्र, 'हरीश',

उभा होता. चेहऱ्यावर परिचित असे स्मितहास्य, पण आयुष्याच्या थकव्याच्या खुणा. राघूने त्याला आपल्या जवळ बोलावले.

“तू आलास हरी,” राघूने हळू आवाजात म्हटले त्याच्या आवाजाने वातावरण काहीसे थरथरले, जणू हरीशचे येणे त्याला आधीच ठाऊक होते.

हरीश हसला, “काय करणार, हा दिवस तर शेवटी यायचाच होता. कसा आहेस?”

“जगतोय. आठवणींच्या आधारावर, एकटा,” राघूने उत्तर दिले, जणू काही ते सत्य बोलून तो आपल्या मनाचा भार हलका करण्याचा प्रयत्न करत होता.

दोघेही बसले, रात्र सरू लागली. हरीश आपल्या गोष्टी सांगू लागला, जुने प्रसंग आठवून देऊ लागला. पण त्या रात्री काहीतरी विचित्र होते—जणू प्रत्येक गोष्ट स्वप्नासारखी वाटत होती. आणखी एक जुनी मैत्रीण, 'मीरा', आली, जिच्याकडे राघू कधीच आपल्या मनातील भावना व्यक्त करू शकला नव्हता पण मनाच्या कुठल्यातरी कोपऱ्यात तिच्यासाठी असलेल्या प्रेमळ भावनांचा ओलावा अजूनही राघू ने जपून ठेवला होता. तिच्या डोळ्यांत आजही ते प्रेम होते, जे कधीतरी आयुष्याच्या धावपळीत कुठेसे हरवून गेले होते.

“राघू, तू नेहमी आपल्या शब्दांच्या जगात जगलास, हृदयातल्या वेग वेगळ्या भावना तू सदैव तुझ्या कल्पनाशक्तीची, तुझ्या शब्दांची

मोहक झालर लावून तुझ्या कवितांमधून, शायरी मधून लोकांसमोर मांडल्या पण ज्यावेळी तुझ्या प्रेमाच्या भावनांना प्रत्यक्ष शब्द देण्याची वेळ आली तेव्हा मात्र तू तुझ्या हृदयाला वाचा फोडू शकला नाही.” मीराने एका हलक्या हास्यासह म्हटले.

राघू गप्प होता. त्याने आजपर्यंत आपल्या भावना कवितांमध्ये लपवून ठेवल्या होत्या, पण आज जे शब्द आयुष्यभर त्याच्यासोबत राहिले होते, ते शब्दही कुठेतरी हरवले होते आणि कदाचित आज त्या शब्दांची गरजही नव्हती, कारण हृदयातील प्रत्येक गोष्ट, प्रत्येक आठवण शब्दांशिवायच व्यक्त होत होती.

त्याच्या मौनात एक जुनी पावसाळी संध्याकाळ आठवली — कॉलेजच्या आवारातल्या त्या जुन्या पिंपळाखाली, जिथे मीरा एकदा आपल्या ओल्या केसांतून पाणी झटकत हसली होती आणि त्याने तिला पहिल्यांदाच आपली एक अर्धवट कविता ऐकवली होती, पण शेवटची ओळ मुद्दामच अपुरी ठेवली होती—जणू ती ओळ पूर्ण करण्याचे धाडस त्याच्यात कधीच नव्हते. आजही, इतक्या वर्षांनंतर, ती अपुरी ओळ त्याच्या ओठांशी तशीच अडखळून थांबली.

रात्र अधिक गडद होत गेली. हरीश आणि मीरासोबत इतरही मित्र येत गेले—सर्व काही स्वप्नासारखे वाटत होते. राम, सुमन आणि इतर अनेक जुने मित्र, ज्यांना राघूने एकेका करून आपल्या आयुष्याच्या कोणत्या ना कोणत्या वळणावर कुठेतरी गमावले होते. प्रत्येक मित्र आपल्यासोबत आपल्या आठवणींची शिदोरी घेऊन आला होता, जो

राघूच्या आयुष्याचा एक एक भाग होता. सर्वजण एकत्र बसून जुने प्रसंग आठवू लागले. प्रत्येक कथेच्या - प्रत्येक आठवणींच्या मध्ये एक विचित्र शांतता होती — ती शांतता, जी एका प्रवासाच्या शेवटानंतरच जाणवते. राघू प्रत्येक क्षण अनुभवत होता, भेटायला आलेले सर्व आप्तच होते, पण तरीही एक विचित्र दुरावा होता.

रात्र अधिक गडद होत गेली आणि एकेक करून सर्व मित्रांनी निरोप घेतला. सर्व निघून गेले, पण आपल्या मागे एक उदास करणारी शांतता सोडून गेले. मीरा मात्र सर्वांत शेवटी निघाली, दारापाशी एक क्षणभर थांबली आणि तिने वळून राघूकडे पाहिले—जणू ती अजूनही, इतक्या वर्षांनंतरही, त्याच्या ओठांवरून ती अर्धवट राहिलेली ओळ ऐकण्याची वाट पाहत होती. राघूने फक्त स्मित केले, आणि ती दाराआडून अंधारात विरून गेली.

राघू आपल्या खुर्चीवरून उठला आणि छताच्या दिशेने चालू लागला. आकाश आता लालेलाल रंगातून काळे झाले होते, जणू काळही थकला होता. राघू छतावर उभा होता, चांदण्या रात्रीत एकटा, शांत. त्याने शेवटच्या वेळी आपल्या जुन्या मित्रांना आठवले. ते सर्व खरोखर आले होते, की ते फक्त त्याच्या मनाने निर्माण केलेले अंश होते? माहीत नाही, राघूकडे याचे कोणतेही उत्तर नव्हते, त्या उत्तराची आता गरजही न्हवती. थंड वाऱ्याची झुळूक त्याच्या चेहऱ्याला स्पर्श करत निघून जात होती.

त्या झुळकीसोबतच, कित्येक वर्षे ओठांशी अडखळलेली ती अपुरी ओळ आज अखेर त्याच्या तोंडातून अलगद निसटली—आकाशातल्या चांदण्यांशिवाय कुणाच्याच कानी न पडणारी, तरीही त्याच्या हृदयावरचे शतकानुशतकांचे ओझे उतरवणारी—"तुझ्याविना उरलेलं हे आयुष्य, एका अर्ध्या ओळीसारखं राहिलं गं मीरा..." शब्द हवेत विरून गेले, आणि त्यांच्यासोबतच त्याच्या मनावरचा तो शेवटचा भारही उतरून गेला.

आज आयुष्याच्या शेवटच्या क्षणी तो समजला होता की, आयुष्य म्हणजे फक्त आठवणींची रांग आहे. शेवटी सर्व काही इथेच राहून जाते, मागे उरतात फक्त काही आठवणी आणि एक शेवटची भेट... फक्त एक शेवटची भेट...

# वारसा

माझ्या आजीचे शेवटचे श्वास सुरू होते आणि आम्ही सगळे तिच्या भोवती जमलो होतो. तेव्हाच आजीने खूप कष्टाने डोळे उघडले, आमच्या सगळ्यांकडे एक नजर टाकली आणि माझ्या वडिलांना, जे त्यांच्या अगदी जवळ बसले होते, त्यांना हळूच म्हणाली— "बेटा हरीश, तू सगळ्यांना... सगळ्यांना बाहेर घेऊन जा, मला रवीशी काहीतरी बोलायचे आहे..."

सगळ्यांच्या जाण्यानंतर आजीने मला खोलीच्या एका कोपऱ्याकडे इशारा करत सांगितले की, "रवी, मला माहीत आहे तुझा संघर्ष काय आहे, तुला काय हवे आहे, पण मी तुला ते थेट देऊ तर शकत नाही... पण... पण कदाचित मी तुला तिथपर्यंत.. तिथपर्यंत पोहोचण्याचा पोहोचण्याचा रस्ता नक्कीच दाखवू शकते..."

मला काहीच समजत नव्हते.... मी भरल्या डोळ्यांनी थरथरत्या आवाजात आजीला म्हणालो.... "आजी, तू काय म्हणतेयस, मला काहीच समजत नाहीये... मला काहीच नकोय आजी, फक्त तू ठीक हो..."

"माझ्या जाण्यानंतर... माझ्या जाण्यानंतर तो फरशीचा भाग फोडून टाक, तिथे तुझ्या कामाची गोष्ट आहे," आजीने पुन्हा त्याच कोपऱ्याकडे बोट दाखवत सांगितले.

मला समजत नव्हते आजी काय म्हणत आहे. मला वाटले की कदाचित कोणतीतरी मौल्यवान वस्तू तिथे पुरलेली असेल... पण हा विचारदेखील मला आनंदी करत नव्हता, कारण माझा माझ्या आजीवर खरंच खूप जीव होता आणि आता तिच्या जाण्याची वेळ झाली होती... तेव्हाच, "रवी, सगळ्यांना आत बोलाव, माझी शेवटची वेळ आली आहे, मला सगळ्यांचा निरोप द्यायचा आहे..."

या गोष्टीला आता जवळजवळ पाच महिने झाले आहेत; आजी त्याच संध्याकाळी देवाघरी गेली. मी अनेकदा आजीच्या खोलीत एकटा बसून राहायचो, तिच्या जुन्या वस्तू पाहत राहायचो... अनेकदा मला असे वाटे, जणू आजी अजूनही आपल्या पलंगावर बसून मला पाहत आहे. आजीच्या दुःखात मी तिने सांगितलेली गोष्ट विसरलो होतो, तशाही मला संपत्तीची कोणतीच लालसा नाही.

मी गेल्या आठवड्यात माझ्या नवीन कथांचे पुस्तक प्रकाशित केले, पण पुस्तक नेहमीप्रमाणे लोकांना काही खास आवडले नाही. माझे आजोबा एक मोठे लेखक, कथाकार आणि वक्ते होते; त्यांच्या अनेक कथा, अनेक पुस्तके खूप चर्चेत होती... जेव्हा मी लहान होतो, तेव्हा मी अनेकदा आजोबांसोबत त्यांच्या पुस्तक प्रकाशन समारंभा, संमेलनादी कार्यक्रमात त्यांच्यासोबत असायचो. कुठेतरी मी त्यांनाच माझा आदर्श मानले होते आणि लेखन हेच माझे करिअर म्हणून निवडले. मी आतापर्यंत सहा पुस्तके लिहिली आहेत, पण एकही पुस्तक कोणाला काही खास आवडले नाही.

गेल्याच महिन्यात एका चुलत भावाच्या साखरपुड्याला गेलो होतो, तेव्हाची गोष्ट अजूनही डोक्यातून जात नाही... जेवणाच्या पंगतीत कोणीतरी काका सहज बोलून गेले, "अरे रवी, अजून किती पुस्तकं छापणार? एकतरी तुझ्या आजोबांसारखं चाललं का रे कधी..." आणि बाकीचे नातेवाईक हसले, अगदी सहज, जणू काही मोठा विनोदच झाला होता. मी पण हसलो, वरवर... पण घरी परत येताना गाडीत मात्र माझे डोळे भरून आले होते, आणि तो प्रश्न कितीतरी वेळ कानात घुमत राहिला.

आता अनेकदा मला नातेवाईकांना भेटताना भीती वाटायची की कोणी मला टोमणे मारू नयेत. असो, मी एकटा सकाळपासून आजीच्या खोलीत बसलो होतो आणि विचार करत होतो की आता पुढे काय करावे—लेखन चालू ठेवावे की दुसरी एखादी नोकरी वगैरे करावी? शेवटी कमवायला तर हवेच ना... घरच्यांच्या माझ्याकडून अनेक अपेक्षा आहेत, ज्या मला पूर्ण करायच्या आहेत.

तेव्हाच मला आजीची गोष्ट आठवली... मी वडिलांची परवानगी घेऊन त्या कोपऱ्यात खोदायला सुरुवात केली. थोडे खोदताच मला एक लाकडी पेटी मिळाली, जिची किल्ली मला आजीच्या कपाटात थोडा शोध घेतल्यावर सापडली. मी अनेकदा विचार केला की या पेटीत असे काय असेल की आजीने याबद्दल फक्त मलाच सांगितले? मी एक-दोन दिवस ती पेटी तशीच ठेवली आणि विचार करत राहिलो की उघडू की नाही; पण दोन दिवसांनंतर मला राहवले नाही. मी वडील आणि बाकी घरच्यांना बोलावले. पेटी समोर ठेवली होती... जेव्हा मी

पेटीचे कुलूप उघडण्यासाठी किल्ली उचलली, तेव्हा जणू माझी धडधड एखाद्या ट्रेनसारखी होत होती. माथ्यावर घाम आणि डोळ्यात अश्रू—कदाचित बाकीच्यांचीही तीच अवस्था होती, कारण कोणीही काहीच बोलत नव्हते, पण त्यांच्या डोळ्यांत पेटीच्या आत काय निघेल याची उत्सुकताही स्पष्ट दिसत होती.

खोलीत इतकी शांतता होती की किल्ली फिरवण्याचा आवाजही असा वाटला, जणू कोणीतरी लोखंडी दांडा घेऊन तो जमिनीवर घासून चालला आहे. मी कसेबसे स्वतःला सावरले आणि पेटीचे कुलूप उघडले... जेव्हा मी पेटी उघडली, तेव्हा मी थक्क झालो! त्या पेटीत कोणतेही सोने किंवा हिरे-माणके नव्हती; त्यात माझ्या आजोबांची आजीसाठी लिहिलेली एक चिठ्ठी होती:

"रवीची दोन पुस्तके काही खास करू शकली नाहीत. मला माहीत आहे की रवी खूप प्रतिभावान आहे, तो आपल्या आयुष्यात नक्कीच खूप यशस्वी होईल... पण आता मी कदाचितच जगेन. याची गरज पडणार नाही, पण जर रवीला लेखक म्हणून यश मिळत नसेल, तर तू रवीला ही पेटी देऊन टाक आणि जर तो यशस्वी झाला, तर या पेटीला नेहमी रहस्यच ठेव... तसही मी त्याला याशिवाय काहीच देऊ शकत नाही.. हाच माझा वारसा आहे."

आणि त्या पेटीत आजोबांच्या चार वह्या होत्या! ज्यातील तीन वेगवेगळ्या कथांनी भरलेल्या होत्या आणि एका वहीमध्ये 'माणूस लेखक कसा बनतो, कथा कशा लिहितात'—अशा अनेक गोष्टींचे मार्गदर्शन लिहिलेले होते.

त्या रात्री सगळे झोपल्यावर मी एकटाच आजीच्या खोलीत, त्या मार्गदर्शनाच्या वहीचे पान न् पान वाचत बसलो होतो. आजोबांचे ते ओळखीचे, थोडेसे कलंडलेले अक्षर पाहताच मला अचानक आठवण झाली—मी सहा-सात वर्षांचा असताना, आजोबा मला त्यांच्या टेबलावर मांडीवर बसवून घेत आणि म्हणत, "रवी, कथा लिहायची म्हणजे काय माहितीय? स्वतःचं दुःखसुद्धा दुसऱ्याला आपलंसं वाटावं, इतकं प्रामाणिकपणे लिहायचं..." त्यावेळी मला त्या शब्दांचा अर्थ काहीच कळला नव्हता, मी फक्त त्यांच्या पेनाशी खेळत बसायचो. पण आज, इतक्या वर्षांनी, त्याच वहीत तेच वाक्य पुन्हा माझ्या डोळ्यांसमोर आले, आणि क्षणभर मला वाटले की आजोबा माझ्या शेजारीच बसून, माझ्या खांद्यावरून वाकून तेच पान माझ्यासोबत पुन्हा एकदा वाचत आहेत.

कदाचित आजोबांची इच्छा होती की त्या कथा मी माझ्या नावाने प्रकाशित कराव्या आणि काही यश मिळवावे, पण मी तसे केले नाही. मी त्या कथांचे 'माझ्या आजोबांच्या कथा' या नावाखाली पुस्तक प्रकाशित केले; आणि ज्या वह्यांमध्ये त्यांनी कथा लिहिण्याचे रहस्य सांगितले होते, ते रहस्य शिकून मी माझे सातवे पुस्तक लिहिले आहे. बघूया, आता ते नक्कीच मला एक यशस्वी लेखक म्हणून ओळख मिळवून देईल... कारण मला माहीत आहे की माझे आजोबा आजही माझ्यासोबत आहेत आणि त्यांनी दिलेल्या या वारशाच्या व कथेच्या माध्यमातून मला मदत करत आहेत.

# माझ बाळ कुठय?

राजेश आणि महिमा नुकतेच लग्न झालेलं जोडप आज पारगावला त्यांनी नविन घेतलेल्या बंगल्यात रहायला आले. तस ती काही नविन ईमारत नव्हती, तो एक जुना दगडी वाडा होता जो राजेश आणि महिमाला आवडला होता शिवाय पारगाव हे राजेशचे वडीलोपार्जित गाव होत पण आजोबांनी गाव सोडल ते कायमचचं, त्यात त्यांच्या अडचणीच्या काळात त्यांना पारगावला त्यांच जे छोटस घर होत ते विकाव लागल आणि त्यांचा व पारगावचा संबध संपला. आपलि प्रॉपर्टी असेल तर त्या निमित्ताने का होईना आपण आपल्या मुळ गावाशी जोडलेले राहु या भावनेने राजेशने तो वाडा विकत घेऊन रीनोवेट केला होता, सोबतच वाड्यासोबतच त्याने आजुबाजुचे माळरानही विकत घेऊन त्यावर छान अशी बाग फुलवलि होती. एकप्रकारे फार्महाऊसच तयार केल होत राजेशने त्या वाड्याच.

संध्याकाळच्या त्या पहिल्या दिवशी, सूर्य मावळतीला टेकलेला असताना, त्या जुन्या दगडी भिंतींना एक विचित्र सोनेरी झळाळी येत होती. रीनोवेशन कितीही झाले असले तरी वाड्याच्या दगडांत मुरलेला तो जुनाट, ओलसर वास काही केल्या जात नव्हता; बागेतल्या मोगऱ्याचा सुगंध त्यात मिसळून एक विचित्र संमिश्र गंध हवेत भरून राहत असे. संध्याकाळ होताच परसदाराकडच्या जुन्या पिंपळावरून घरट्याकडे परतणाऱ्या पाखरांचा किलबिलाट आणि दूरवर कुठेतरी

कुत्र्याचे विनाकारण भुंकणे, हे सगळे त्या वाड्याला एक गूढ, जुनाट अस्तित्व बहाल करत होते—जणू त्या भिंतींना अजूनही आपला जुना इतिहास आठवत होता.

राजेशचा वडीलोपार्जित असा बिझनेस असल्यामुळे पैशांचा तसा कधिच काही प्रश्न नव्हता, शिवाय तो सुध्दा त्यात उत्तमरीत्या हातभार लावत होता. महिमा उद्योगपति संपतराव म्हणजे राजेशचे वडील यांच्या एका पार्टनर आणि त्यांचा लहाणपणीचा मित्र रमेश यांची कन्या, त्यामुळे राजेश आणि महिमा एकत्रच वाढले अस म्हणायला हरकत नाही, वयात येता येता कधि त्यांचे एकमेकांवर प्रेम जडले हे काही कळाले नाही. काहीकाळ एकमेकांना वेळ दिल्या नंतर ज्यावेळी त्यांनी त्यांच्या प्रेमाची कबुली त्यांच्या पालकांसमोर दिली आणि एकमेकांसोबत लग्न करण्याची ईच्छा व्यक्त केली त्यावेळी अर्थातच दोन्ही कुटुबांनी आनंदाने त्यांना संमती दिलि.

राजेश त्याच काम घरूनच करत असे, अठवड्यातुन एखाद्यावेळी ऑफिसला चक्कर मारणे किंवा काहि बिझनेस डिल असल्यास अधुन मधून दोन चार दिवस बाहेर जाणे सोडल्यास राजेश आणि महिमा यांच्यात दुरावा असा नव्हताच. घरातिल, शेत-बागेतिल कामांसाठी त्यांनी गावातिल महेश आणि रमा या जोडप्याला कामावर ठेवले होते. खरतर महेशनेच त्यांच्या वाड्याच्या आजुबाजुची बाग फुलवलि होती, त्यामुळे महेश त्याबागेतल्या प्रत्येक झाडाची स्वत:च्या मुलांप्रमाणे जपणुक करत असे. रमा आणि महिमा या दोघी मालकिन आणि

कामगार यापेक्षा जास्त मैत्रिनीच. ज्यावेळी राजेश बिझनेससाठी बाहेरगावी जाई त्यावेळी रमा महिमाच्या सोबतिला बंगल्यातच राहत असे. तासंनतास एकमेकींसोबत गप्पा मारणे हा जणु त्यांचा दिनक्रमच. सोबतच कधी कधी राजेशचे किंवा महिमाचे आई – वडील देखिल बंगल्यावर भेट देत असत. काम झाल्यावर फवल्या वेळेत आरामखुर्चीत तासनतास बसुन महिमा सोबत गप्पा मारणे, महेश सोबत आवडीने बागेतिल झाडांची निगा राखने यात दिवस कसा निघुन जातो हे राजेशला कळतही नव्हते. संसार तर आनंदाने चालु होता सोबतच बिझनेस देखिल अगदी हवा तसा चालु असल्यामुळे चिंता अशी काही नव्हती.

नुकतेच राजेश आणि महिमाच्या सुखि संसाराला एक वर्ष पुर्ण झाले. त्या आनंदात भर म्हणुन कि काय महिमाने राजेशला गोड बातमी दिली. दोघही आनंदाच्या सातव्या आकाशात होते. राजेशची आई सरीता आणि महीमाची आई रुख्मीनी या दोघी देखिल आता महिमाची काळजी घेण्यासाठी बंगल्यावरच राहु लागल्या, राजेश सुध्दा आता महिमाची आणखि जास्त काळजी घेत होता.

राजेश..... आपल बाळ... रात्री अचानक महीमा अचानक घाबरुन उठली तिच्या आवाजाने राजेशही दचकुन उठला. महिमाचा आवाज ऐकुन महिमाची आई आणि सासु देखिल तिथे आल्या.

काय झाल महिमा? राजेशने चिंतातुरतेने विचारल.

महिमा फक्त ढसाढसा रडत होती. तिचा कंठ दाटुन आल्यामुळे तिला बोलताही येईना, तिच्या आईने तिला कवटाळले,

काय झाल महिमा... काहि वाईट स्वप्न बघितल का..? महिमा थोडी शांत झाल्यावर तिच्या सासुने तिला पुन्हा विचारले.

या प्रश्नाने तिला तिचे स्वप्न आठवले आणि पुन्हा ती रडायला लागलि.

बोल ग बाळा.. काय स्वप्न पडले. काय झाल. महिमाच्या आईने तिला सावरत विचारले.

महिमा सांगु लागलि.

आपल्या बागेत मी बसले होते तेव्हढ्यात तिथे एक बाई आलि तिच्या गावातल्या बाया जशा साड्या घालतात तशीच साडी तिने घातलि होती म्हणुन मला वाटले गावातलिच कोणी असेल म्हणुन मीहि तिच्याशी गप्पा मारत होते, बहुतेक मीच तिला माझ्या खोलित घेऊन आले होते. अचानक मला अस वाटल की मी माझ्या बेड वर झोपुन तिच्या सोबत गप्पा मारत होते ती माझ्या शेजारी बसुन गप्पा मारत होती. बोलता बोलता तिने माझ्या पोटावर खुप प्रेमाने हात फिरवला आणि माझ्याकडे हसुन बघत माझ्या गरोदरपणा बद्दल आपुलकिने चौकशी केली. मी तिला सांगतच होते तोच... तोच.... महिमाच्या तोंडुन भितीने शब्दच फुटेना... ती घटना आठवुन ती ओक्साबोक्शि रडत होती. राजेशने तिला थोड पाणी पाजले, पाणी पिऊन तिला थोडी

हुशारी आल्यावर ती सांगु लागली. मी तिच्या सोबत गरोदरपणा बद्दल गप्पा मारत होते तोच ती माझ्या मांड्यांवर बसली आणि तिने माझे हात घट्ट पकडल्यामुळे मला हलताही येईना, मी ओरडायचा प्रयत्न करत होते पण माझा आवाज जणु बाहेर निघतच नव्हता, तोच ती रडू लागली, मी पोटोशी असुन मला कधी बाळ झाल नाही अस म्हणुन ती जोराजोरात रडू लागली, मला काहीही कळत नव्हते आणि माझ्या तोंडुन आवाजही फुटत नव्हता, ती पुढे म्हणाली मला बाळ नाही झाल कधि – नाही झाल मला... आणि माझ्या पोटावरुन हात फिरवत होती. ईकडे माझा जिव कासाविस व्हायला लागला होता मला ना हालता येत होत, ना माझ्या तोंडून आवाज निघत होता ना मला रडताही येईना, ईकडे ती बाई माझ्या पोटावर हात फिरवतच होती. हात फिरवता फिरवता तिच्या चेहऱ्यावरचे हावभाव बदलायला लागले, तिच्या चेहरऱ्यावर असलेल्या वेदनेची जागा आता क्रुरता घेत होती, रडायच थांबवत ती म्हणायला लागलि. मला बाळ नाही झाल, मग तुला कस होणार, अचानक तिच्या चेहऱ्यावर क्रुर हसु पसरले सांग ना जर मला बाळ नाही झाल तर बाळ गेल कुठ? ईकडे मी भितीने स्तब्ध झाले होते. सांग ना कुठय माझ बाळ... नक्कीच तुझ्याकडे आहे माझ बाळ.... तुच घेतल माझ बाळ... आता मला परत पाहिजे. अस म्हणुन ती पुन्हा रडायला लागली. तु देशिल ना मला माझ बाळ मला, दे मला माझ बाळ.... दे... अस म्हणतच तिने माझ्यापोटावर असलेला हात माझ्या पोटात घुसवला.... आणि मी डचकले.... महिमाचे रडने काही

थांबत नव्हते. कसबस या तिघांनी तिला समजावत तिला धीर दिला आणि झोपि लावल.

मागचे पाच दिवस रोज महिमाला तेच स्वप्न पडत होत त्यामुळे महिमा आता झोपायलाही घाबरत होती, त्याचा परीनाम तिच्या प्रकृतीवर दिसत होता. तिचा चेहरा पांढरा पडायला लागला होता. डॉक्टरने कदाचित तिच्या मनावर ताण आल्यामुळे अस होत आहे अस म्हणुन काहि गोळ्या औषधे दिले पण त्याचा काही परीणाम होतोय अस तरी दिसत नव्हते. राजेशचा विश्वास नसुन देखिल राजेशच्या आईने दिलेल्या शपथेमुळे आणि महिमाच्या काळजीमुळे राजेशने एका पुजाऱ्याला बोलावले होते...

किशोर महाराज तसे अवघ्या २२ वर्षांचे पण कित्येक पिढ्यांपासुन तंत्र विद्येचा वारसा लाभल्यामुळे त्यांची आध्यात्मात चांगलिच गति होती. अनेकांच्या अडचणी त्यांनी स्वत:च्या अनुभवाने आणि ज्ञानाने सोडवल्या होत्या. त्यांच्या याच नाव लौकिकामुळे राजेश त्यांच्यापर्यंत पोहचला होता... त्यांनी पुढच्यावेळी जेव्हा परत तुला स्वप्न पडेल त्यावेळी त्याबाईला तिने बाळ कस गमावल हे विचार... आणि घाबरु नको आता ती बाई तुला कसलाही त्रास देऊ शकनार नाही अस म्हणत तिच्या मनगटावर एक रक्षासुत्र बांधले. आणि तिच्या उशाखालि ठेवायला एक अंगाऱ्याची पुडी महाराजांने राजेशच्या आईकडे दिली.

दुसऱ्या दिवशी

आज महीमा ११ ११:३० झाले तरी उठली नव्हती. तिला हव तितक्यावेळ झोपु द्या अस किशोर महाराजांने सांगितलेले असल्यामुळे आणि तसही गेले काही दिवस तिची झोप झाली नसल्यामुळे कोणी तिला उठवले नाही. १ च्या दरम्यान महिमा उठली चेहऱ्यावर उदासी जरी असली तरी तिची झोप पुर्ण झाल्यासारखे दिसत होते. तिचा नाश्ता वगैरे चालु असतानाच किशोर महाराज त्यांच्या घरी आले. महिमासोबत थोड्यावेळ बोलल्यावर त्यांनी पुन्हा विषयाला हात घातला... महिमाताई काय... विचारले का तुम्ही त्या बाईला तिने तिच बाळ कस गमावल याबद्दल?

हो.... चेहऱ्यावर उदासी आणत महिमा बोललि.

मग, काय म्हणाली ती?

ती आणि तिचा नवरा या वाड्यात राहत होते. तिला जवळपास तिसरा महिना होता, त्यावेळी तिच्या दारुड्या नवऱ्याचे त्याच्या काही टुकार मित्रांनि तिच्या पोटात असलेल्या बाळ हे त्याचे नसुन सरपंचाचे आहे असे कान भरले आणि नेमकेच काही योगायोग असे झाले होते ज्याने त्याचा संशय विश्वासात बदलला. तिचे आणि तिच्या नवऱ्याचे भांडण चालु होते आणि रागाच्या भारात तिच्या नवऱ्याने तिच्या पोटावर लाथ घातली आणि तिचा गळा दाबुन जिव घेतला....

कनका... कनका नाव आहे त्या बाईच... किशोर महाराजांच्या तोंडून त्या बाईच नाव ऐकुन सगळे प्रश्नार्थक नजरेने त्यांच्या तोंडाकडे

पाहत होत. महाराजांनी पुढे सांगायला सुरवात केली. मी इकडे येण्याआगोदर गावात गेलो होतो सरपंचांच्या घरी काही माहिती मिळती का या वाड्याबद्दल त्यावेळी मला त्यांनी सगळी घटना सविस्तरपणे सांगितलि. अस म्हणुन महाराज पुढे सांगु लागले.

हि घटना जवळपास पन्नासएक वर्षापुर्वीची आहे. हा वाडा तत्कालिन सरपंच हंबिरराव यांचा होता गावासाठी झटणारा माणुस म्हणुन त्यांचा नावलौकिक होता. जितका ते स्वत:च्या परीवाराचा विचार करत त्याहून जास्त ते गावाचा आणि गावकऱ्यांचा विचार करत, त्यांच्यासाठी झगडत पण त्यांचा मुलगा संपत हा मात्र त्यांच्या अगदी विरोधि स्वभावाचा निघाला सुरवातिला बिनआईच लेकरु म्हणुन त्यांनी संपतच्या खोडसळपणाकडे जास्त लक्ष दिले नाही, जसा तो वयात आला तसा आणखिनच बिघडत गेला, त्यात त्याची संगतसुध्दा टुकारच होती. त्याच्या कोठीवरच्या चकरा चालु झाल्या. ज्यावेळी हंबिररावांना ही खबर लागली त्यावेळी त्यांनी त्याला समजावून पाहिले, मारुन पाहिले पण संपतचे मात्र पहिले पाढे पंचावन्नच, शेवटी वैतागुन हंबिररावांने त्याला वठनिवर आणायचा नाद सोडून दिला.

काहि वर्षांने संपतचे लग्न निमगावच्या एका कनका नावाच्या मुलिशी लावुन दिले, मुलगा आतातरी योग्य मार्गावर येईल ही त्यांची अपेक्षा होती आणि आश्चर्यकारक गाष्ट म्हणजे झालही तसच. संपत आता शेतीच्या कामात आणि प्रसंगी हंबिररावांच्या कामातही

कधिकधि मदत करु लागला. हंबिररावांचे वय झाल्याने आता त्यांनी सरपंचकी सोडायचा निर्णय घेतला. पुढचा सरपंच कोण होणार याबद्दल ज्यावेळी बोलण चालु होत त्यावेळी संपतचे नाव हंबिररावांनी गावासमोर मांडले पण त्याचा मुळ स्वभाव माहिती असल्यामुळे गावकऱ्यांनी त्याला विरोध केला आणि माळ्याच्या किशन सरपच म्हणून कारभार संभाळू लागला. ईकडे हातची सरपंचकी गेली म्हणुन संपत पुन्हा बिघडायला लागला त्याने परत जुन्या व्यसनांचा आधार यागोष्टीपासुन स्वत:ला दूर ठेवण्यासाठी घेऊ लागला. ज्यावेळी अधुन मधून किशन हंबिररावांचा सल्ला घेण्यासाठी यायचा त्यावेळी संपतच्या तळपायाची आग मस्तकात जायची, पण आपल्या बापासमोर आपल काही चालणार नाही हे ठाऊक असल्यामुळे तो गप्प रहायचा.

संपत आणि कनकाच्या लग्नाला सुमारे दोन वर्षे झालि होती, हंबिररावांची प्रकृती वृध्दापकाळाने खालवलि होती, कनकाने संपतला आणि हंबिररावांना आपल्याला दिवस गेल्याचे सांगितले, सगळकाही आनंदात चालू होते संपत पुन्हा बायकोच्या आणि बापाच्या काळजीपोटी निट वागु लागला होता पण कदाचित काळाला काही त्यांचा आनंद मान्य होता अस वाटत नाही कारण अवघ्या एका महिन्यातच हंबिररावांच वृध्दापकाळाने निधन झाले. आधिप्रमाणे सारख सारख नसेल तरी अधुन मधून संपतच त्याच्या टुकार

मित्रांसोबत दारु ढोसने चालुच होते. हंबिरराव गेल्यानंतर कित्येक रात्री या दोन जिवांच्या कनकाने संपतच्या काळजीत घालवल्या होत्या.

त्या रात्री बाहेर आभाळ भरून आले होते, विजांचा दुरून गडगडाट ऐकू येत होता आणि वाड्याभोवतीच्या रानात वाऱ्याने पाला सळसळत होता—जणू निसर्गालाही पुढे घडणाऱ्या त्या भयंकर घटनेची चाहूल लागली होती. दिव्याची वात मंदपणे तेवत होती, आणि त्या अर्धवट उजेडात कनका एकटीच स्वयंपाकघरात संपतची वाट पाहत बसली होती, पोटावर हात ठेवून, आत वाढणाऱ्या जीवाशी काहीतरी पुटपुटत.

संपतचा कोणी मित्र दारूच्या नशेत संपतला म्हणाला... दोस्ता तु आपला मैतर हायस र पण त्या बयान काही तुझ्याबर बर नाय केलं... तुला ठाव हायका वईनी च्या पोटातल बाळ कोणाच हाय... आर ते तुझ नाय.... ते त्या किसनाच हाय... आपल्या सरपंचाच... आधिच संपतच्या मनात किशनबद्दल राग होता आणि आता तर अस काही ऐकल्यामुळे तर त्याच्या रागाला सिमाच उरली नव्हती पण आधि त्याला धोका देणाऱ्या बायकोचा निकाल लावायचा होता.. आधिच दारुच्या नशेत असलेल्या संपतने त्याच्या मित्राच्या कानफटात मारली, आणि तो घरी आला आणि कनकाला जाब विचारू लागला.... आव अस काय बोलतायसा.... हे आपल लेकरु हाय... कनका त्याला सांगत होती पन ते काही ऐकुन घ्यायच्या मनस्थितीत संपत नव्हता... त्याने शिवि हासडत कनकाच्या पोटावर एक जोरात लाथ मारली.. त्या लाथेने आधिच तळमळत पडलेल्या कनकाचा गळा दाबुन त्याने जिव

घेतला.... तिला तिथेच वाड्याच्या परसदाराकडे पुरुन तो बेपत्ता झाला... पुढे काही दिवसाने त्याला पोलिसांने ताब्यात घेतले.. त्यानेही रागाच्या भारात आपल्याकडून आपल्या बायकोचा खुन झाल्याची कबुली दिली.. पुढे दोन वर्षाने त्याने तुरुंगातच मलेरीयाने जिव सोडला... व्यसनापाई त्याने आधिच त्याचा वाडा व शेतजमिन गहान ठेवलि होती ती मालमत्ताही वसुलित गेली.. पुढे यावाड्याच रुपांतर एका गोडावुनमध्ये झाल आणि आत्ता तिन वर्षांपुर्वीच सरकारने त्या मालमत्तेच्या निलामिचा निर्णय घेतला आणि राजेशने ती मालमत्ता विकत घेतली.

किशोर महाराजांने सांगितलेला वृतांत ऐकुन सगळेच थक्क होते... पन आता आपण काय करायच माझ्या महिमाला हा त्रास कधि पर्यंत होणार? महिमाच्या चिंतेने महिमाच्या आईने महाराजांना विचारले...

त्याची काळजी करण्याच कारण नाही तिचा अंत्यविधि झाला नसल्याने तिचा आत्मा या जगात आहे, मी उद्यासंध्याकाळच्या आत त्यासाठी विधि करेल ज्याने कनका या जाचातुन मुक्त होईल.. मी महिमाच्या आतावर बांधलेल्या रक्षासुत्रामुळे आज स्वप्न पडले जरी ती महिमाला त्रास देऊ शकनार नाही.... किशोर महाराज म्हणाले.

सात महिन्याने महिमाने एका सुंदरशा बाळाला जन्म दिला.... दुसऱ्या दिवशी तिच्या कुशित बाळ असताने अचानक तिच्या

चेहऱ्यावरे भाव वेगाने बदलु लागले.. अचानक तिच्या डोळ्यातला आनंद शतपटिने वाढल्यासारखा वाटु लागला... तिने बाळाकडे अत्यंत प्रेमाने व वात्सल्यपुर्ण नजरेने पाहिले पटापटा बाळाचे मुके घेतले... थोड्यावेळ बाळासोबत खेळली, बाळ भुकेने रडायला लागल्यावर त्याला ममतेने पाजले, बाळ निजल्यावर त्याच्या शेजारी महिमाही झोपुन बाळाला कुरवाळु लागलि.. समोरच तिची सासु बसलेली होती ती म्हणाली.. काय ग महिमा आज खुपच प्रेम उतु चाललय माझ्या नातवावर...

तेवढ्यात खोलीतला पंखा उगाचच थरथरल्यासारखा वाटला, खिडकीतून येणारा मंद वारा अचानक गार, अगदी बर्फासारखा गार होऊन खोलीभर पसरला आणि टेबलावरच्या समईची ज्योत एकदा भयंकर लवलवून पुन्हा स्थिर झाली—सरीताबाईंच्या अंगावर नकळत काटा उभा राहिला. तेवढ्यात महिमा सरीताबाईंकडे (तिची सासु) बघुन गोड हसलि व काहीतरी अस बोललि ज्याने सरीताच्या चेहऱ्यावरचा रंग उडाला... महिमा म्हणाली.. मी तर चालले आता पण तुम्ही सगळयानी यवस्थित संभाळा माझ्या लेकाला जीव लावा त्याला, चांगला माणुस बनवा...

# अगम्य

निता :- ती गावातल्या दुकानात (त्यांच्या स्वत:च्या) भावाला मदत करायची. तिचा भाऊ रवी ही कामानिमित्त शहरा बाहेर गेल्याने आज तिला घरी जाण्यासाठी वाटेत सहप्रवासी कोणीही नव्हते. ती त्या घनदाट जंगलातील वाटेने नेहमीच जात असे, पण रवी तिच्या सोबत असायचा आज मात्र तीच्या सोबतीला कोणीही नव्हते.... जगलातल्या काळ्याकुट्ट अंधारात ती नेहमीच्या रस्त्याने चालली होती. रस्ता खडकाळ होता पण प्रवाश्यांच्या सोईसाठी रस्त्यावर ठराविक अंतरावर असणाऱ्या खांबावरच्या पिवळ्या बल्ब चा अंधुकसा पिवळसर प्रकाशात वातावरणात अणखिनच भेसूरता आणत होता.

हळुहळु वातावरणात काहितरी विचित्र बदल होतायत हे निता च्या लक्षात आल्यावर ती अणखिनच झप झप पावले टाकत जवळ जवळ पळतच चालली होती. पण आपण खुप वेळा पासून एकाच जागी येत असल्याची नोंद तिच्या मनाने घेतली आणि तिच्या मनात भीतीचे सावट दाटून आलं. तिला चकवा लागल्याने अगदीच घाबरून गेली होती भीतीने तिला दरदरून घाम फुटला होता.

ढगांच्या अचानकपणे सुरू झालेल्या गडगडाटाने भर उन्हाळ्याचे दिवस असूनही पावसाचे चिन्ह दिसत होते. एक थंड वाऱ्याची लहर

निता च्या शरीरावर रोमांच उभे करून गेली त्या बरोबरच रस्त्यावरच्या लाईट्स गेल्या आणि भितीने निता बेशुद्ध होऊन पडली.

•

ज्या वेळेस तीला जाग आली तेव्हा एका अनोळखी ठिकाणी होती. तिथल्या लोकांमधे तिला काहीतरी वेगळेपणा जाणवत होता.

रंगा रूपाला अफ्रिकेतील लोकांसारखे आणी थोडेसे कमी उंची असणारे लोक होते. जणूकाही त्यांची प्रजाती वेगळी आणी प्राथमिक अवस्थेत असल्यासारख वाटत होतं.

अगदी निसर्गरम्य ठिकाण उंच उंच डोंगर टेकड्या स्वच्छ पाण्याचे झरे असलेल वेगवेगळ्या पक्षी प्राणी असणार ठिकाण होतं.

निताला घरच्यांची आठवण येऊन काही दिवस अगदि अस्वस्थ व्हायच पण काही दिवसातच ती त्या लोकांमध्ये रमु लागली. त्या लोकांना वाटायचं की ईश्वरानेच तीला त्यांच्या मदतीला पाठवले आहे.

त्या आदिवासी लोकांना नुकताच काही पिढ्यांपुर्वि शेतीचा शोध लागला होता आणि त्यामुळे त्यांच्या वस्त्या वसु लागल्या होत्या. संस्कृति अगदी प्राथमिक स्तरात पण बऱ्यापैकी स्थिर झाली होती. लोकांच्या मुला मुलींना निता अनेक प्रकारचे खेळ, तोडके मोडकी भाषा, बालगीते शिकवायची. आईला स्वयंपाकात मदत करण्याची सवय असल्याने ती तिथल्या बायकांना वेगवेगळे पदार्थ करून दाखवायची. तिच्या गुणांनी तिने सगळ्याची मने जिंकली होती.

त्यांच्यातल्या एका पोरसवदा मुलाला, ज्याचं नाव मित्रांनी उच्चारल्यासारखं काहीसं 'मोरु' असं वाटायचं, त्याला निता रोज संध्याकाळी झाडाखाली बसवून हाताच्या बोटांवर मोजत आकडे शिकवायची. तो कधीच नीट आकडे मोजू शकत नसे, पण दर वेळी चुकला की तितक्याच निरागसपणे हसायचा, आणि ते हसू निताला घरच्या आठवणीतून तात्पुरतं बाहेर काढायचं. तिथल्या एका वयस्क बाईने, जिला सगळे 'आज्जा' म्हणत, निताला तिथल्या रानभाज्या ओळखायला शिकवल्या होत्या, आणि बदल्यात निताने तिला कणकेची पोळी कशी लाटायची हे दाखवलं होतं—दोघींमध्ये भाषेचा एकही धागा सामाईक नसतानाही, हातांच्या हालचालीतूनच एक विचित्र समजूत तयार झाली होती. संध्याकाळी शेकोटीभोवती बसून तिथले लोक काहीतरी गुणगुणत, ती चाल निताला कुठल्याच भाषेत बांधता येत नव्हती, पण ती ऐकताना छातीत काहीतरी उमाळून यायचं.

हल्ली काही दिवसांपासून नाताची तब्येत हळुहळु ढासळत चालली होती पण त्या लोकांना पुरेस वैद्यकीय ज्ञान नसल्यामुळे ते तिचा उपचार करू शकत नव्हते. सततचा ताप खोकला याने तिचा जिव कासावीस होई, रोजची काम करता करता एक दिवशी अशक्तपणाने अचानक भोवळ येऊन पडली.

पडता पडता तिच्या डोळ्यासमोर क्षणभर तिच्याच घराचं अंगण, आईच्या हातातला स्वयंपाकाचा वास आणि रवीचा आवाज असं

काहीतरी तरळून गेलं—की तो नुसता भास होता, हे तिचं तिलाही नीट सांगता आलं नसतं.

**

ईकडे रात्रीचा १ वाजून गेला तरी पोरगी घरी कशी आली नाही याची काळजी सुमनबाई म्हणजेच नीताची आईला वाटत होती एकतर काळोखी रात्र त्यात दुकान आणि वस्तिचा रस्ता पार जंगलातून. आज तिच्यासोबत रवीहि नव्हता एकट्या पोरीला बघुन कोणी काही बाही तर केलं नसलना या विचारांनी त्या माऊलीच्या काळजात धस्स झालं.

तडक उठून वस्तीतल्या काही माणसांना घेउन सुमनबाई पोरीला शोधायला जंगलाच्या वाटेने गेली.

अर्ध्यावरच नीता रस्त्यावर पडलेल्या अवस्थेत दिसली. भितीने चेहरों पिळवटून गेल्यासारखा दिसत होता. लोकांनी तिला उचलले आणि गावातल्या एका डॉक्टरकड घेऊन गेले. पोरीचि अवस्था बघुन सुमनबाई भेदरून गेल्या होत्या. त्यांना सोबतच्या लोकांनी कसाबसा धीर दिला.

डॉक्टरांनी नीता कोमात गेल्याच सांगून लवकरात लवकर शहरात घेऊन जाण्याचा सल्ला दिला. दुसऱ्या दिवशी सकाळी रवी घरी गेल्यावर नीता आणि आईची विचारपूस केल्यावर त्याला वस्तीवर परत आलेल्या लोकांनी दोघे गावातल्या डॉक्टरच्या दवाखान्यात असल्याच सांगितले.

रवी आल्याबरोबर डॉक्टरांनी त्याच्याकडे शहरातील एका हास्पिटल च्या नावाने चिठ्ठी देऊन रुग्णवाहिकेची व्यवस्था केली.

आज जवळ जवळ ७ महिन्याने निताला कोमातुन शुध्द आली होती बाजुला आपली आई आणि भावाला बघुन जितका आनंद झाला होता तितकीच ती संभ्रमात पडली होती. तिला कळत नव्हते की आपल्याला आलेला अनुभव काय होता.

तिचा अनुभव खरा होता आणि अत्ताची परिस्थिती देखिल. पण कस शक्य होत हे..?

रवी:-निता तब्बल ७ महिन्याने शुध्दिवर आली होती. पण शुध्दिवर आल्या आल्या थोड्यावेळ निता काहीशा संभ्रमात दिसली होती. खर तर निता माझी मोठी बहीण, तिची तीव्र बुध्दी, बोलण्यात एक प्रकारच माधुर्य पण काहीशी एकांतप्रिय जितकी विनोदी तितकीच गंभीर असा स्वभाव असल्याने तिला सर्वांची मिळणारी वाहवाही याचा मला खुप हेवा वाटायचा. निताला जेवढी विज्ञानाची आवड तितकीच आध्यात्माची ओढ आहे. तशी ती काहीशी विज्ञानवादी असल्यामुळे तिचा कर्मकांड वगैरे वर विश्वास नाही म्हणा..! पण तिला योगशास्त्रावर प्रचंड विश्वास आहे.तिच्या १० वीच्या परीक्षेनंतर सुट्टीत १५ - २० दिवसाच्या कसल्यातरी शिबिरात गेली होती तिथून जेव्हा परत आली त्यावेळेस ती काहीशी बदलल्या सारखी वाटत होती. म्हणजे तिचा एकलकोंडेपणा खुपच वाढला होता तिचे कामे, कॉलेज व आईला हवी नको ती मदत करून झाली की तिचा उरला सुरला

सगळा वेळ ती घराजवळच्या शेतातल्या एका झाडाखाली बसून राहिलेली असायची. आई तिला कीतितरी वेळा रागवलि होती पण... पण कुणी सांगुन ऐकेल ती निता कुठली..!

मागच्या दीड दोन वर्षांपासून तीचा एकलकोंडेपणा बऱ्यापैकी कमी झाला आहे. बारावी नंतर तीने शाळा सोडून आईला घरात व मला मी नुकत्याच चालवायला घेतलेल्या आमच्याच दूकानात खुप मदत करू लागली होती. हो.. आणखीन एक आता तिच्या आवडीनिवडी सुध्दा बदलल्या आहेत आता आध्यात्म, योगशास्त्र या विषयावर विश्वास असून सुध्दा या गोष्टींपासून चक्क स्वतः ला बाजूला केले होत. तिचा स्वभावात आलेला मनमोकळेपणा बघुन आई सुखावली होती. तीने निता च्या लग्नासाठी स्थळे बघायला सुरुवात केली होती. ४ दिवसांनी तीला बघायला येणार होते आणि त्या दिवशी ती घटना घडली होती..!

तालुक्यावरून निघतानाच मला काहीतरी खटकल्यासारखं वाटत होतं, रस्त्यात गाडी दोनदा बंद पडली. मी काय अंधश्रद्धाळू वगैरे नाही, पण त्या रात्री गाडी चालवताना सारखं वाटत राहिलं की घरी लवकर पोहोचायला हवं. पोहोचलो तेव्हा घर रिकामं होतं, आणि तेव्हाच शेजारच्यांकडून कळलं की आई आणि निता दवाखान्यात आहेत.

सुमनबाई :-निता ला काय झाल होत कुणास ठाऊक. तशी माझी पोर लय गुणाची हाय. कदी मदी वागतीया जरा आकरीत पण विचारी हाय ती.तीचे शाळेतले मास्तर म्हणायचे लई हुशार हाय ती पण कदी

मदी पारच वेगळी वागतीया. माग तीला दुकानातून घरी यायला पारच उशिर झाला होता. माझ्या बापडीच्या मनी काय काय आल होत..! त्यात रवी पण शेरात गेला व्हता. लई रात्र झाली तरी पोर घरी आली नाही म्हणून वस्तीतल्या काही माणसांना सोबत घेउन गेले शोधायला. माझी निता मधीच पडल्याली होती. ते बघुन काळजात धस्स झालं होतं. सोबतीला आलेली माणस निताला गावातल्या डॉक्टर कड घेउन गेलोत.

सात म्हैने झाले तरी माझी पोर काय बोलंना, काय हलंना. रोज देवाजवळ दिवा लावून बसायची मी, म्हनायची देवा एकदाच डोळं उघड माझ्या लेकीचं, मग बग तुला काय पायजे ते मागते. गावातल्या बाया म्हनायच्या यड लागल्यालं आपल्या बाईला, पन मला काय त्याच्याशी घेणदेणं नव्हतं, माझी पोर मला परत पायजे व्हती, बास्स.

नीता :-लहान पणापासून मला विज्ञानाची खुप आवड आहे. आणि विज्ञानातील संज्ञा, व्याख्या कळायच्या सुध्दा पटकन. मला जितक विज्ञान आवडत तितकच आध्यात्मसुध्दा आवडत. तस माझा देवावर फारसा विश्वास आहे अस नाही म्हणता येणार. पण तरीही.. माझी ७-८ वी तालुक्यातल्या महाविद्यालयात झाली. तिथल्या ग्रंथालयात मी तासंन तास मी कधी विज्ञानाची पुस्तके, कधी विज्ञान कथा, कधी ईतर गोष्टी वाचत बसायचे. त्याच वेळी मी विज्ञानातल्या वेगवेगळ्या संकल्पना, सोबत पतंजली योग सूत्रे वगैरेचा अभ्यास केला होता.. मला वाटल होत की माझी उत्सुकता कमी होईल पण कसल

काय ती आणखीनच वाढत होती. ऐन १० वी ला घरच्या काही कारणांमुळे मला परत गावातल्या शाळेत याव लागल.१० वी च्या सुट्टीत गावात एक ध्यान धारणा शिबिर लागणार होत मी मोठ्या मुश्किलीने आईची परवानगी घेऊन शिबिराला गेले. खर तर शिबिराला जाण्यामागे फक्त उत्सुकता होती. तीथे खुप गोष्टी शिकायला मिळाल्या. तिथून आल्यावर मला ध्यान लावण्याची जणू काही लत लागली मी सतत माझ्याच दुनियेत रमु लागले. असेच दोन अडीच महीने गेले. माझ कॉलेज सुरू झाल होत. पण कॉलेज मध्ये माझ मन रमायचच नाही. आधी वाचल होत की माणसाच ध्यान सिध्द झाल की त्या माणसाला दूरवर असणाऱ्या एखाद्या योग्यांशी बोलता येत. म्हणल बघाव प्रयत्न करून. दोन तीन वेळा प्रयत्न केल्यानंतर एकदाचा झाला एका महान योगी महाराजांशी संपर्क त्यांच्याकडून खुप काही शिकत होते. स्थूल शरीर , सुक्ष्म शरीर (मन) वगैरे वगैरे. त्या वेळी ते आपण आपल्या सुक्ष्म शरीराने कसा प्रवास करू शकतो काय काय करू शकतो. हे शिकवत होते.

त्या दिवशी सहज मी माझ्या खास मैत्रिणीशी गप्पा मारत बसले होते. तर मी तीला सगळ काही सांगितलं ती मनोविज्ञानाचा अभ्यास करत होती आणी सुट्टी साठी घरी आली होती. तीने मला सांगितल की हे जे काही तुझ्या सोबत जे होतय ते भास आहेत वगेरे.

स्वाती—तिचं नाव. आम्ही दोघी लहानपणापासूनच्या मैत्रिणी, तिच्या घराच्या ओसरीवर बसून आम्ही कितीतरी दुपारी गप्पांमध्ये

घालवल्या होत्या. त्या दिवशीही ती तिच्या नेहमीच्या सवयीप्रमाणे हातातल्या पेनने वहीच्या कोपऱ्यावर रेघोट्या मारत, माझं सगळं ऐकून घेत होती, आणि शेवटी तिने पुस्तकी भाषेत समजावून सांगितलं की हे 'हॅलुसिनेशन' किंवा 'लुसिड ड्रीमिंग'सारखे प्रकार असू शकतात.

खर तर हे ऐकून मला खुप वाईट वाटल होत. पण मी विचार केला की ती त्याच गोष्टींचा अभ्यास करते त्यामुळे बोलतेय ते खर असेल. त्यामुळे कस बस मन मारून मी ध्यान लावणे बंद करून टाकल. अस अचानक केल्यामुळे काही दिवस त्रास झाला पण नंतर सवय होऊन गेली सगळ्या गोष्टींची. १२ वी झाल्यावर मी शिक्षण सोडून दिल आणि आईला घरी मदत करू लागले सोबतच माझ वाचन सुध्दा खूप वाढल मी जवळ जवळ रोज गावातल्या छोट्याश्या ग्रंथालयातून पूस्तके आणून फावल्या वेळात वाचू लागले, तशी वाचनाची आवड लहानपणापासून आहे फक्त आता विज्ञानाऐवजी विज्ञान कथा आणि आध्यात्मा ऐवजी त्या प्रकारातल्या कथा, कादंबरी तसेच रहस्य कथा वगैरे असा बदल तेवढा झाला.

रवीने आमचच पण भाड्याने चालवायला दिलेल गावातल दूकान स्वत: चालवायला घेतल. रवीला मी आणि आई मदत करू लागलोत. आम्ही दोघेही दूकान चांगल संभाळत आहोत हे बघून आईने रोज दुकानात येण बंद केल होत.त्या दिवशी दुकानातला माल संपला म्हणून माल आणण्यासाठी रवी तालुक्याला गेला होता आणि त्यामुळे त्याला यायला खुप उशीर होणार होता म्हणून मी एकटीच घरी

जाण्यासाठी निघाले. एक तर सकाळ पासून काही विचित्रच वाटत होत कालच्या कादंबरी वाचनाचा परीणाम असावा आणि त्यात आज घरी एकटच जाव लागणार होत. एकतर हल्ली माझी तब्येत पण बरी नसते. जवळ जवळ रोज रात्री झोप लागत नाही त्या दिवसभर दमल्या सारखच वाटत. कदाचित तेच कारण आहे की माझ वाचन खुप वाढलय. आता मी मन रमण्यासाठी एक रहस्यांनी भरलेली कादंबरी लिहायला घेतली तर आहे ज्यात मी माझ्या आधी केलेल्या आध्यात्मिक - विज्ञान या मधल्या वेगवेगळ्या कल्पना वापरणार आहे, पण माहीती नाही जमेल की नाही. तस मला काही ती कादंबरी प्रकाशित वगैरे करायची नाहीये, मी फक्त माझा वेळ जावा म्हणून लिहीते. जाऊद्या....,

हल्ली रवी माझी खुप काळजी घेतो तसा तो कधी दाखवत नसला तरी खुप प्रेम आहे त्याच माझ्यावर तो त्याने मला रात्र रात्र वाचन करताना बघितल तो माझ्यासाठी ईतक्या रात्री पण झोप आलेली असताना कधी कधी चहा कींवा कधी कधी थोडा नाश्ता वगैरे बनवतो आणि मुद्दाम माझ्या समोर बसून हळू हळू खातो ते त्याला भूक लागली म्हणून नाही काय... तर त्याला माहीती आहे की हल्ली मला रात्री जेवन धड पणे सरत नसल्याने मी रात्री कित्येक वेळा जेवत नाही ते... आणि त्याला हे पण माहित आहे की जर त्याने मला जेवणासाठी आग्रह केला तरी मी काही जेवण करणार नाही म्हणून त्याची ही एक युक्ती... तस मला त्याची युक्ती आहे हे माहित असूनही मी तो खायला लागला की

मुद्दाम हेव्या दाव्यान घेतल्या सारख नाटक करून त्याच्या सोबत रात्री उशिरा जेवत असे. रवी दुकानात जरी गिऱ्हाईकांशी जरी खूप बोलत असला तरी त्याला बोलण्याची काही विशेष आवड नाही. आज घरी जाताना रवी सोबत नव्हता तर त्याची खूप आठवण येते आहे.. कमी बोलत असला तरी तो असा काही बोलायचा की ऐकणारा कीती पण उदास असूदे काही वेळे साठी त्याच्या चेहर्यावर हसू आलच पाहिजे.

रात्री सात साडेसात वाजता घरी जाण्यासाठी निघाले तस वाटेत काही भिती नव्हती या आधीही मी एकटीच दोन तीन वेळा एकटी गेले होते पण माहित नाही का आज जराशी भिती वाटत होती तरीही मनाची तयारी करून निघाले. थोड्या थोड्या अंतरावर रस्त्याच्या कडेला लाईटचे खांब होते त्यामुळे अंधाराची भिती नव्हती पण तरीहि सोबत बॅटरी घेतली होती.सगळा मिळुन दोन अडीच किलो मीटर चा रस्ता. आज वातावरणात काही बदल होतायत अस उगाच वाटून गेल. रातकीड्यांच्या आवाजाने शांतता भंगत होती. मधेच कुठेतरी कुत्र्यांच्या विव्हळण्याचा आवाज वातावरणात अणखिनच भेसूरता आणत होता. अशा वेळी काय काय मनात येत होतं. त्यातल्यात्यात मी फिरून फिरून एकाच जागेवर सारखी सारखी येत आहे अस वाटत होत. त्या सगळ्याच्या एकूणच परीणामाने की काय डोक खुपच दुखायला लागलं तरी मी घराच्या ओढीने झप झप पावले टाकत चालत होते. अचानक मला मी ध्यान धारणा करत असताना ज्या आवाजाला गुरु मानल होत त्या आवाजात मला कोणीतरी हाक मारतय अस

वाटल. तेवढ्यात रस्त्यावरच्या लाईटी गेल्या आणि माझ्या समोर एक धूसर मानवी आकृती प्रकट झाली. पुढे बहूतेक मी बेशुद्ध पडले होते.ज्या वेळी मला भान आल त्या वेळी ती आकृती माझा हात हातात धरून मला खुप वेगाने कुठेतरी घेऊन चालली आहे अस वाटल. ज्या वेळी मी डोळे उघडून आजुबाजुला पाहण्याचा प्रयत्न केला तेव्हा मला काहीतरी आधी कधिही प्रत्यक्षात न बघितलेल्या गोष्टी दिसल्या. जणूकाही मी अंतराळात प्रवास करत आहे कारण अस वाटत होत की आम्ही आकाशगंगेच्या मध्य बिंदुकडे भयंकर वेगाने चाललो होतो. एका ब्लॅकहोल कींवा वर्महोल कडे..! मी त्या आकृतीला त्या बद्दल विचारल तर त्या ओळखीच्या आवाजात उत्तर मिळालं की तूच ब्रमांडाविषयी बोलताना विचारल होत की वेगवेगळे आयाम कीवा वेगवेगळे ब्रंम्हांडांचे खरच अस्तित्व असत का? आणि असेल तर आपण तिथे जाऊ शकतो का? आणि त्यावेळी मी तूला एवढच उत्तर दिले होत की योग्य वेळ आल्यावर तूला ते कळेलच..!ती योग्य वेळ आता आली आहे..!

.....

डॉक्टर:

गेले सात महिने निताची फाईल माझ्या टेबलावर सतत होती. सुरुवातीचे दोन महिने तिच्या मेंदूचे रिपोर्ट्स अगदी ठराविक कोमा पेशंटसारखेच होते—शांत, संथ लहरी. पण तिसऱ्या महिन्यापासून जे

काही दिसायला लागलं, ते मी वैद्यकीय पुस्तकांतही फारसं वाचलेलं नव्हतं.

आज नीताला हास्पिटल मध्ये भर्ती करून सात महीन्याने तिला शुध्द आली आहे. मला खर तर एका गोष्टीच विशेष वाटल ते अस की नीता भलेही कॉमा मध्ये असली तरी तीचा मेंदूचा कल्पना करणारा हिस्सा आणि लक्ष केंद्रीत करायला मदत करणारे भाग मागच्या दिड महिन्या पासून सक्रिय आहे.

साध्या भाषेत सांगायचं झालं तर, कुणीतरी सलग सात महिने डोळे मिटून, अगदी जागं असल्यासारखं काहीतरी बघत, अनुभवत राहावं—इतकी सक्रियता मी आजवर कुठल्याही कोमातल्या रुग्णात पाहिली नव्हती. ते नक्की स्वप्न होतं, आठवण होती, की आणखी काही—हे ठरवणं माझ्या अभ्यासाच्या कक्षेबाहेरचं आहे.

असो ती उठल्यावर कळेलच काय ते..

**आपण माझ्या या कथांना आपला मूल्यवान वेळ दिला त्याबद्दल आपले आभार!**

**तुमची प्रतिक्रिया माझ्यासाठी अत्यंत मूल्यवान आहे. ती आपण nishchintvachak@gmail.com आपण या मेल वर किंवा nishchint_vachak या Insta handle वर पाठवू शकता.**

**आपल्या प्रतिक्रिया आणि प्रतिसादाच्या प्रतीक्षेत!**